Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० ४ मे सन १८७३ इ० | अंक १८

## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८ |
| ,, अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

गजकरणाचे औषधाच्या डब्या किंमत ०६ आणे. थंड पाण्यांत भिजवून गंधाप्रमाणें झाल्यावर उटीसारखें लावावें.

शिवलीलामृत अध्याय ११ व व्यंकटेशस्तोत्र

असें एकत्र पुस्तक कोणी भाविक गृहस्थानीं आमचे छापखान्यांत टाइपावर छापविलें त्याच्या थोड्या प्रति विकावयाच्या आहेत. किंमत ०६ आणे व डाकहाशील ०१

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि, वि. खालील चार ओळी लिहून आपणाकडे पाठविल्या आहेत. तर त्याचा अव्हेर न होतां आपले अमोल्य पत्रीं त्यांस जागा द्याल अशी आशा बाळगून आहे.

ईश्वर, आईबाप, व सरकार यांचा फारसा भेद नाहीं. कारण जसे ईश्वराचे मनांत जगाचें कल्याण व्हावें तसें आईबापाच्या मनांत मुलाचें कल्याण व्हावें. व सरकाराचे मनांत रयतेचें कल्याण व्हावें. मग कल्याणार्थ कोणीही कांहीं सक्ति केली तर दोष नाहीं हें उघड आहे. म्हणून मला वाटतें कीं, या वऱ्हाडांत विद्यावृद्धीच जर करणें आहे तर लोकांवर मुलें पाठविण्याबद्दल काहीं सक्ती केली पाहिजे. ती अशी कीं, मुलगा पांच वर्षांवर जहाला कीं, अमुक वर्षें त्याने शाळेंत अभ्यास केला पाहिजे. व तो सरकारानें पसंत केलेले पंतोजीच अगर सरकारी मास्तराचे शाळेंत राहिला पाहिजे. याचें कारण या वऱ्हाडात अशी कांहीं विलक्षण चाल पडून गेली आहे कीं, जो कोणी वृध्द मनुष्य जहाला, व ज्याला अगदीं कांहीं सामर्थ्य नाहीं त्याणे चार मुलें घेऊन बसावें आणि लोकांस नाडून अगोदर पैसे (दरमुहा १ रुपयाप्र० ) घ्यावे. ही एक उघड ठकबाजी म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. तर इकडे सरकारानें लक्ष पुरविलें पाहिजे, नाहीं तर मोठें गाव सोडून दुसरे ठिकाणीं ज्या सरकारी शाळा दरसाल दोनशें चारशें रुपये खर्च करून केलेल्या आहेत तो खर्च व्यर्थ होईल असें आम्हांस वाटतें. अगर इतके तरी करणें अवश्य आहे कीं, जो मुलें शिकवितो त्याजवळ विद्याखात्यांतील अधिकारी यांचें सरटिफिकिट पाहिजे.

आपले तारीख १३ एप्रिलचे अंकांत एक न या सहीचें पत्र छापलें गेलें आहे त्यांत तेल्हाऱ्याचे शाळेविषयी मजकूर आहे तो खरा आहे आणि ती शाळा अशा स्थितींत येण्याचें कारण गावठी शाळा होती व त्यावरील पंतोजी केवळ वृद्ध असून कामाचे उपयोगी नाहीं मग तेथील अधिकारी रा. मनाजी देशमुख याजला कसे आवडले असतील ते असोत हल्लीं नवीन मास्तर आल्यापासून मी असें ऐकिलें आहे कीं, मि. नरसय्या चीं. का. व रा. मनाजी देशमुख यांणीं शाळेला मदत करण्याचे कामीं बरेच लक्ष पुरविलें आहे. नरसय्या चीफ हे सरकारी कामांत फार हुशार व कुशाग्रबुद्धीचे आहेत व तसेच मनाजी देशमुखही आहेत तेव्हां अर्थातच त्यांणीं मनावर घेतल्यास शाळेची सुधारणा होणार नाहीं असें आपल्यानें म्हणवणार नाहीं. पत्रकर्ते महाराज आपण माझा गरीबाचा अंगीकार करतां म्हणून आपले दर्शन घ्यावें असें वाटतें. अस्तु. पत्र विस्तार जहाला याची माफी असावी कळावे हीच विनंती. तारीख १५ माहे एप्रिल सन १८७३ इसवी.

एक "न"

### दृष्टियंत्रावर दृष्टी द्या.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

वि. वि. मनुष्य उद्योग करूं लागला म्हणजे यश येतें. रा. रा. बळवंतरावजी पेंडसे वरणगांवचे मामलेदार यांनीं त्या दृष्टियंत्राविषयीं नाना उपाय केले ते किती एक वेळ फसले तरी त्यांनीं उद्योग व धैर्य सोडलें नाहीं. हल्लीं आरशाच्या चमकीवर त्यानीं चमक दिली तितक्या अंतरावरून खास नेल्ती येईल अशी सर्वांची खात्री करून दिली. ही चमक पंचवीस तीस कोसांवरून स्थान मानानें दिसते. आतां नेत्रिवांस साक्ष नाहीं. पहा अमेरिकेंत विजेच्या योगानें तारायंत्र तारें न चूनच चालण्याची युक्ती निघाली. त्याची सर्वत्र प्रसिद्धी झाली आणि आमच्या रावसाहेबांना फुकाचें ते काय करितात हे समजून घेण्यासही लोक भेटत नाहींत. काय आश्चर्य हें!!!

मागें ज्योतीच्या योगानें सावद्याहून बातमी घेतली व दिली हें वर्तमान अरुणोदयास मिथ्या वाटलें. आतां हल्लींच्या युक्तीची प्रचीत ज्यांस पहाणें असेल त्यांनीं खुशाल पहावी इतकेंच नाहीं तर थोर लोकांनीं ती चालविण्यास प्रयत्नही करावा. ह्या युक्तीना उपयोग तारायंत्राप्रमाणें सर्वांस होईल. खर्चही विशेष नाहीं पांच रुपयांचे आंत. आतां ही युक्ती साभ्र दिवशीं आणि रात्रीं मात्र चालणार नाहीं. त्या वेळाकरितां काय योजना करावी ह्याविषयीं त्यांचे प्रयत्न चालू आहेत.

अशा उद्योगी पुरुषाचा समागम सतत असावा. परंतु लिहिण्यास दुःख वाटतें कीं, यांनीं पेनशनाचा अर्ज केला व लौकरच काम सोडणार. पेनशनाचा काळ ते देशहिताच्या कामाकडेसच घालविणार. याचें नाव देश हितेच्छु! तारीख २४ एप्रिल सन १८७३ इ०

वरणगांवकर.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्र कर्ते यांस—

साष्टांग नमस्कार वि. वि. महाराज आलेला नमस्कार अथवा गुड बाय आपली मर्जी असल्यास घ्या, नाहीं तर द्या डिपाझिटमध्यें टेवून. एडिटरसाब, मला माझे मालकाचे सहवासानें फार फिरण्याची सवय आहे. त्यांत मी या तुमचे वऱ्हाड प्रांतांत येऊन थोडेच दिवस झाले, त्यांत फिरत फिरत या जळगांवीं आलों. हा गाव पाहतांच जो आनंद झाला तो सांगतां येत नाहीं. बाहेर होतो तोंपर्यंत भ्रमच होता; परंतु जसा गांवांत गेलों तसा आनंदाचा पूर वारंवार येऊं लागला—गावांतील रस्ते तर किती स्वच्छ व साफ आहेत कीं असे कोठेंच पहाण्यांत नाहींत. सहज मनुष्य एका बाजूनें म्हणजे मधील रस्ता सोडून गटाराकडून जर चालला तर घोट्यांपर्यंत पाय गुळांत बुडून जातात. मग मध्य रस्त्यानें जर गेले तर किती पाय जातील हें सांगवत नाहीं. यावरून येथील लोक किती हौसी आहेत हें सहजी लक्षांत येईल. हा गुलाल शिमग्याचा नव्हे हो. येरव्ही पेरांचा खळग्याचा आहे. या ठिकाणाहून भर दोन प्रहरचे वेळेस पायांत जोडा न घालतां गेले म्हणजे सर्गांच हटीस पडणार यांत तिळप्रायही संशय नाहीं. प्रातःकाळीं व अस्तमानचे वेळेस कित्येक ठिकाणीं रस्त्यावर पाणी सिंचन केलेलें असतें त्याचा सुवास फारच उत्कृष्ठ येतो. आधीच वसंत ऋतूचे दिवस त्यांतून ह्या रस्त्यावर सुगंध पाण्याच्या योगानें जाणारा येणारांस फारच आनंद होतो. हें पाणी तुम्ही म्हणाल आडांतील असेल तर नाहीं बरें. अति उत्तम ठिकाणचें आहे [ कित्येक दिवसाच्या सांचलेल्या मोऱ्यांतील ] गावचे पूर्वेस गुरांस वगैरे पाणी पाजण्याचें ठिकाण आहे. तेथें तर बोवा, माझी अक्कलच गुंग झाली. ते जनावरांचे क्लेश. भोगा समजावें कीं त्यास इतकें सुगंधी पाणी कित्येक दिवसांनीं पिण्यास मिळतें. असले अमृत कोणाचे बापजन्मींही पाहिलें नसेल. गांवांत सडकेवर टाकण्यासाठीं बहुतेक ठिकाणीं चांगलें माळीव मातीचे ढीग करून ठेविले आहेत. बहाद्दर म्युनिसिपाल कमिटी! याचें नाव काम नाहींतर तुम्ही आहां, रात्रं दिवस टाइप जोडण्याचें व वेळेवर आपले पत्र काढून गिऱ्हाइकांस खुष ठेवण्याचें कामीच लागतां. यांत काय तुम्हाला बरें वाटत असेल तें असो. जर तुम्हास, किचा घेणें असेल तर या गावचे म्युनिसिपाल कमिटी पासून घ्या.

अहो महाराज आणखी एक गम्मत माझे पाहण्यांत आली. आम्ही आकाशमार्गानें जात असतां एक नवीच मोठी इमारत गांवचे बाहेर पश्चिमेस दृष्टीस पडली तेव्हां हें काय आहे म्हणून पाहण्यास किंचित जवळ गेलों तों गांवोगांवचे लोक तेथें जमले होते. यावरून ही तहशिलदार कचेरी आहे असें वाटलें. जवळ गेलों तों पांच पंचवीस लोक आपापसांत बोलत चालले होते; त्यांत कांहीं मारवाडी, कांहीं ब्राम्हण वगैरे होते. त्यांचे बोलण्यात आम्ही फिर्यादी देऊन पंधरा पंधरा दिवस झाले तरी अजून फैलावर घेत नाहींत. काय करावें! नाहक नुकसान होत आहे. म्हणोन वगैरे म्हणत होते. कां एडिटर साहेब, आहे कीं नाहीं गम्मत. असें, कोठें कोठें असेल का? कीं पंधरा दिवस फिर्याद फैलावर सुध्दां नाहीं मग फैसल होण्याची आशा कशास पाहिजे! वादीचे वाचनाचे वेळेस कदाचित फैसल झाल्यास होत असेल. अस्तु कांहींशी स्थिती आपणास कळविली आहे. पत्र विस्ताराचें भय वाटत असल्यामुळें अधिक लिहित नाहीं. परंतु पुनः लौकरच भेटेन. कळावे हो आदाब, गुड नाइट. मुक्काम जळगांव वऱ्हाड. तारीख १७ एप्रिल १८७३ इसवी.

वेताळाचा सेक्रेटरी पिशाच.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. आपणाकडे खालील चार ओळी लिहून पाठविल्या आहेत. तरी आपण मेहरबानी करून त्यांस आपले सुंदर पत्रीं जागा द्याल अशी आशा बाळगून आहे.

महाराज या वऱ्हाडांत विद्यावृद्धी होण्या करितां आपलें दयाळु इंग्लिश सरकार किती झटत आहेत; आणि लाखो रुपये ही त्याकामाकडे खर्च करित आहेत असें असून वऱ्हाडांतील लोकलफंड इंजिनियर खात्यांतील लोक तिकडे लक्ष न देतां पाहिजे तशी इमारतीचीं कामें करितात. महाराज मी मौजे धनज येथें कांहीं कामाकरितां पोलिस स्टेशनांत गेलों तेव्हां रस्त्यापासून दूर पूर्वेचे बाजूस एक नवीन जाहलेली इमारत पाहिली तेव्हां मी तींत शिरलों तों आंत शाळा नाहीं असें पाहिलें. नंतर तेथें क्षणभर विसावा घ्यावा म्हणून बसलों इतक्यांत तेथें कोणीएक मनुष्य आला तेव्हां मी त्यास विचारिलें कीं ही इमारत सरकारांनीं कोणत्या कामाकरितां बांधलेली आहे!

नंतर तो सांगूं लागला, महाराज धनज हा गाव सुमारें पांचशे घरांची वस्ती असून रस्त्यावरील असल्याकारणानें सरकारानें सुमारें तीन हजार रुपये लाऊन शाळा हीन बांधलेली आहे परंतु ह्या इमारतींत मुलें चार पांच महिने बसलीं नाहींत; तोंच पूर्व दिशेकडील भिंत खचली; याकरितां तूर्त शाळा सरकारानीं गावांत जुनी एक जागा आहे तींत बसविली आहे. का? एडिटर महाराज ज्या इमारतीस तीन हजार रुपये लागून तिचा योग्य उपयोग होऊ नये? बरें असो.

नंतर ता० ३० माहे एप्रिल सन १८७३ या महिन्याचे १० वे तारखेस लोकल फंड इंजिनीयर त्यांतील मि० मारो साहेब एथें आले होते त्यांनीं एथील मराठी इंग्लिश शाळा पाहिली आणि मुलांचा अभ्यास व व्यवस्था पाहून खुशी झाले. मि० मारोसाहेब लोकलफंड इंजिनीयर यांची स्वारी ९ वे तारखेस एथें आली ती २ दिवस होती पण तितक्या काळांत त्यांनीं सर्व पहावयाच्या त्या गोष्टी पाहिल्या. शाळेंतील मुलें दोन रांगांनीं उभीं केलीं होती त्यांनीं लोकल फंड इंजिनीयर साहेब येताच त्यास एकदम सलामी दिली. ती मोठी मौज दिसली रा. रा. शंकर पांडुरंग राक्षे मास्तर हे आपले कामीं फार दक्ष दिसतात. त्याचप्रमाणें त्यांनीं सडकेचें काम व पोलिस स्टेशन ही पाहिलें. एथील महमद याकूब चीफ कानस्टेबल यांची फोर्थ क्लासदर्जाची ह्मणजे ४० रुपये पगाराची जागा होती ती थर्ड क्लासची होऊन हल्लीं त्यांस ५० रुपये मिळूं लागले आहेत. एडिटरमहाराज, पत्रविस्तार फार झाला करितां माफी मागतो. कळावें तारीख २३ माहे एप्रिल सन १८७३ इ०

एक विद्यार्थी.

# वऱ्हाडसमाचार.

मिती वैशाख शुद्ध ८ शके १७९५

## भिडे भाटवडेकर प्रकरण.

यवतमाळ येथें रा० विनायक रावजी भिडे स्कूल मास्तर आहेत व रा० रा० विनायक रामचंद्र भाटवडेकर बी. ए. हे डिपुटि एजुकेशनल इन्स्पेक्टर आहेत आणि त्या दोघांमध्यें कांहीं वाद चालू झाला आहे. हें कित्येक दिवसांपासून लोकांत थोडें बहुत समजलेंच असेल. तरी एका पक्षानें आपले बाजूची ओढाताण करून दुसरे बाजूस दूषणें दिल्याचें बरेंच पाहण्यांत आलें व ही गोष्ट गेल्या आठवड्याच्या वऱ्हाडसमाचारांत "अंधळ्या शोधकास काठी" या सहीनें जें पत्र प्रसिद्ध झालें आहे तें पाहिल्यानंतर मनांत येते. त्या पत्र लिहिणाराचा रोख भाटवडेकराविरुद्ध आहे. व तें पत्र महाराष्ट्रमित्रांतील शोधकास उत्तर ह्मणून आहे कां तर शोधकानें भिड्याचे विरुद्ध त्यांत लिहिलें आहे. असा प्रकार उभय पक्षांस ही योग्य नाहीं असें आमचें मत आहे. त्यांत आमच्या पत्रांतील काठीनें तर नावाप्रमाणें केवळ माराच केला आहे. व लिहिण्याचा सभ्य संप्रदाय बाजूस ठेविला आहे असें 'जंगमाचे खांद्यावरला', 'टिकोजी', 'कुलीन पटवेकऱ्याचा वंश', 'चोंढती केली', 'बाटली झाकली', इत्यादी शब्दांचा उपयोग केला आहे यावरून सहज दिसतें. आतां या वलगना कोणी कितीही केल्या तरी त्यांपासून फल होणार आहे असें नाहीं. मि० क्यांडी साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर विचारी व न्यायी आहेत व ते दोन्ही पक्षांची चौकशी बारकाईनें करीत आहेत तेव्हां खरा प्रकार त्यांचे दृष्टीस येईल व ते अधिक प्रसंग करणारास शासन करितील असा भरवसा आहे.

आतां उभयतांच्या भांडणाविषयीं पाहतां भाटवडेकर यांजवर जे दोष भिडे यांनीं आणिले आहेत ते त्यांस साहजिक दृष्टीस पडले किंवा कोणी येऊन कळविले अथवा ते मोठे दळदळीत होत असे आह्मास जी माहिती मिळाली आहे तिजवरून दिसत नाहीं. भिडे यांनीं ते उकरून काढिले असावे व त्याकरितां कित्येक दिवस त्यांचा मोठा प्रयत्न चालू असावा असें दिसतें. तालुक्यांतून भाटवडेकर फिरत असतां कांहीं कारणानें सदर स्टेशनांत आले तर भिडे यांनीं रात्रींच्या रात्रीं पोलिसास कळविलें कीं, तुह्मी भाटवडेकर यांजवर पैरवी ठेवावी कारण आह्मी त्यांवर फौजदारी च्यार्ज आणणार आहों. व त्यावरून पोलिसानें त्यांच्यावर नजर ठेवण्याकरितां त्यांच्या दारीं दोन शिपाई ठेविले जणू काय लोकांस वाटावें कीं ते पोलिसाचे प्रतिबंधांत आहेत. दुसरे दिवशीं भाटवडेकर कामानिमित्त बाहेर गेले असताही ते शिपाई त्यांच्या बरोबर होते. ही केवढी मनास दुःख देणारी गोष्ट आहे पहावी! तसेंच भिडे मास्तर यानीं तहशिलदारास अशा अर्थाचें एक पत्र लिहिलें कीं, तुमचे तालुक्यांत भाटवडेकर डिपुटि इन्स्पेक्टर कोणकोणत्या गावीं कधीं किती दिवस होते याचा तक्ता पाठवावा. हें हुकूमदाखल व त्रासकारक लिहिणें तहशिलदारास अयोग्य वाटून त्यांनीं डिपुटि कमिशनर साहेबाकडे त्याविषयीं गिल्ला केला व त्यावरून भिडे यांस तसें न करण्याची ताकीद देण्याविषयीं त्यांनीं भाटवडेकर यांस लिहिलें. त्यांनीं त्या प्रमाणें ताकीद दिली. त्यावर भिडे यांनीं अशा प्रकारची तक्रार केली ह्मणतात कीं, अशी नुसती ताकीद उपयोगी नाहीं, आह्मांकडे मुळापासून सर्व प्रकर्ण पहावयास पाठवा तेव्हां आह्मी ऐकूं. हाताखालच्या नोकरानें वरिष्ठास असें ह्मणणें ह्मणजे केवळ शिरजोरपणाचें काम आहे असें सर्वांस वाटेल. मास्तरानें इन्स्पेक्टराशीं असा फाजिलपणा केलेला आमचे डायरेक्टर साहेबांसही सहन होऊं नये असें आह्मांस वाटतें. असो एवढ्यावरच भिडे स्वस्थ बसले नाहींत, यांनीं भाटवडेकरावर तक्रारी काढिल्या त्यांचा पुरावा करण्या करितां डायरेक्टर साहेबांनीं त्यांस हुजूर बोलाविलें तेव्हां भिडे मास्तर हे त्यांचे वरिष्ठ डिपुटि इन्स्पेक्टर जे भाटवडेकर त्यांस पत्र लिहितात कीं, आह्माला हुजूर, [तुम्हांला दोषी ठरवून शिक्षा देवविण्या करितां] जावयाचें आहे त्यासाठीं तुमचा कारकून शिपाई, व दप्तरांतील कागदपत्र आमचे कडे द्या, आह्माला त्यांची जरूरी आहे. अहाहा! हें भिड्याचें लिहिणें किती पोरचेष्टे सारखें आहे. पुष्कळ दिवस पुणा कालेजांत व १९ वर्षें जगाच्या कालेजांत राहिलेल्या विनायकराव भिड्यास हा आपण केवळ अधिक प्रसंग करितो असें वाटावें; हें त्यांच्या शहाणपणाच्या केवळ कळसाचें काम आहे. असे ह्मटलें असतां चालेल. भिड्याचें पत्र हा भाटवडेकर यांस हुकूम की काय? डायरेक्टर साहेबांच्या परवानगीशिवाय भाटवडेकरांनीं आपला कारकून, शिपाई, दप्तर वगैरे भिड्यास देऊन आपण नगलावर करुम नसावें हें त्यांना डिपुटि सारखे समजून भिड्याच्या मतें शहाणपणाचें झालें असतें काय? व भिड्यांच्या लेखाप्रमाणें भाटवडेकर आपलें आफिस त्यांच्या स्वाधीन करते तर डायरेक्टर साहेब त्यांना मोठा टपका न देते काय? हें ही असो. याहून एक तिसरी गम्मत ही कीं एक दोन वेळा अशी मूर्ख पत्रे भिडे यांनीं लिहिलीं व त्यांचे जबाब भाटवडेकरांनीं दिले नाहींत तेव्हां आणखी एक चुरचुरीत पत्र भिड्यांनीं त्यास लिहिलें कीं तुह्मी उत्तरें देत नाहीं तेव्हां तुह्मी गुन्हेगार असावेत व तुमची आतां लवकरच तजवीज होईल. वाः! न्यायमूर्ती भिड्यांनीं भाटवडेकर यांस अपराधी ठरविलेंच पण लागलीच शासन का केलें नाहीं? कोण जाणें! तेथें धर्मराजाचा अवतार घेतला व भाटवडेकर यांवर दया केली असें दिसतें. असो यांत आणखीही लिहिण्या सारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. परंतु विस्तारभयास्तव लिहित नाहीं.

भिडे यांनीं भाटवडेकराचे बाबदींत डेपुटि कमिशनर साहेबाकडे वारंवार पत्रव्यवहार चालविला त्यास त्रासून त्यांनीं भिडे यांस कळविलें कीं तुमची इच्छा असेल तर तुह्मी त्यांवर फौजदारी च्यार्ज आणा हा उगीच पत्रव्यवहार नको. त्यावरून त्यांनीं फौजदारींत फिर्याद केली व दरम्यान डायरेक्टर साहेबांनीं डिपुटि कमिशनरास लिहून खात्याच्या संबंधानें तें प्रकरण आपलेकडे चौकशीस घेतलें आणि भिडे यानां हुजूर बोलाविलें त्याप्रमाणें ते चिखलदऱ्यास जाऊन डायरेक्टर साहेबाचे स्वारीत गेले व त्यांनीं आपला पुरावा हजर केला त्यावरून डायरेक्टर साहेबांनीं भाटवडेकर यांस बावीस प्रश्न लिहून त्यांचीं उत्तरें मागितलीं. तीं त्यांनीं तत्काळ पाठविलीं. व पाठीमागून त्यांस दहा दिवसांची रजा मिळाली होती त्या अवधींत त्यांनीं डायरेक्टर साहेबांची भेट घेऊन अनंतर माहितीही त्यांस कळविली. हीं प्रश्नोत्तरें प्रकरणाचा निकाल झाल्यानंतर आह्मांस जर मिळालीं तर आह्मी प्रसिद्ध करूं. आतां डायरेक्टर साहेब या प्रकरणाचा जो निर्णय करितील तो त्यांनीं सर्वांस महशूर होण्या करितां वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करावा अशी आह्मी त्यांस शिफारस करून प्रकरण आह्मी आज पुरे करितों.

## वऱ्हाड

दिवाणी कोर्टास सहा आठवड्यां सुट्या मिळाल्या व विद्याखात्यास मे म न्याची सुटी मिळाली यामुळें ठिक काणाहून बहुत लोक पुणें मुंबई कडे गे एकदोन दिवस आगगाड्यांचे डबे खू रत आहेत.

—ooo—

असें वर्तमान आहे कीं विद्याखात्या डायरेक्टर डा० सिंक्लर साहेब ये अक्टोबर महिन्यांत आपले कामावर येणार.

—ooo—

उमरावतीच्या हायस्कुलाच्या वाईट स्थितीविषयीं गोमाजी कापशे साहेबांचें एक पत्र मागें वऱ्हाडसमाचारांत प्रसिद्ध झालें आहे. त्यांत तेथील असिस्टंट मास्तर रा. रा. रघुनाथ बा ण तळवळकर बी. ए. यांचा हात सावा असा कोणी संशय घेतात हे असें ऐकतों. व त्याकरितां आह्मी र दिलगीर आहों. आमच्या पत्राच्या द्वारानें कोणास राग यावा व त्यांत पा सदरहू तळवळकर सद्गृहस्थांचें दूषित व्हावें हें ऐकण्यास देखील वडत नाहीं त्या स्कूलावरील हेड मा मि० ग्याकिटाश सा. व विद्याखात्याचे रेक्टर मि० क्याण्डी. साहेब यांस इमानें रें आह्मी असें कळवितो कीं, तें पत्र रहू बी. ए. यांजकडून आह्मांस आलें हीं. व त्यांत त्यांचें कांहीं अंग त्याविषयीं आह्मांस बिलकूल माहित हीं. यास्तव त्यांनीं त्याविषयीं संशय रावा अशी आमची त्यास वि आहे.

—ooo—

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार ए. अकोल्याचे डि. इ. इन्स्पेक्टर र ऊन रत्नागिरीकडे गेले– रा. रा. ब रामचंद्र प्रधान वाशिमचे डि. इ. इन्स्पे रजा घेऊन कापदापोलीकडे गेले. रा. चिमणाजी राजाराम पाठक तीचे डि. इ. इन्स्पेक्टर दीड महिन्या रजा घेऊन मोगलाईंत आपले गावीं व त्यांचे काम चालविण्यास रा. सदा गोविंद दामले मिडलक्लास स्कुलमास्तरास सांगितलें आहे. रा. रा. विष्णु राम बापट खामगावचे क्लार्क आफ र्ट हे सुटींत पुण्यास गेले.

—ooo—

उन्हाळ्यामुळें तिजोरी दर रोज काळीं साडेसहा वाजल्यापासून साडे वाजेपर्यंत आतां खुली राहील. व श नेहमीप्रमाणें उघडून साडे दहा बंद होईल. शनवारीं साडे नऊ वा चे पूर्वीं एक तास व नेहमी साडे पूर्वीं एक तास चलानें केलीं यापेक्षा ज्यास्त विलंब लागल्यास व्हा हेड अकौंटंट घेणार नाहींत.

उमरावती व नदनेरा या दोन स्टेशनांचे दरम्यान रेलावर दगड ठेवल्यावरून तीन इसमांवर खटला होऊन एकास तीन व दुसऱ्यास दीड वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा झाली. सदर्हू दोन इसमांची व लाइनीवरील मोकदमाची अदावत असल्यामुळें त्याचा सूड उगविण्याची त्या विघ्नसंतोषी इसमांनीं तजवीज योजिली पण ती त्यांसच भोंवली!

—०००—

उमरावतीचे साहेबलोकास नदनेरा एथील आगगाडीकडील साहेब लोकांनीं एक मेजवानी दिली गुडस शेड हाणजे माल ठेवण्याची जागा फार सुशोभित केली होती. हा थाट ता. १४ एप्रिल रोजी झाला. या समयीं नाच प्रातःकाल पर्यंत सुरू होता.

—०००—

ताजनापेठेंतील हिंदुस्थानी मास्तर मि॰ सयद नबी यांस उमरावतीस ६० रुपये पगार होता पण तेथील शाळेची स्थिती कांहीं बिघडल्यामुळें मास्तर यांस ५० रुपये करून अकोल्यास नेमिलेले आहे. त्यांनीं येथील शाळा चांगली सुधारली सबब डायरेक्टर साहेबांनीं खुश होऊन पुन्हां त्यांचा ६० रु. पगार केला असें समजते.

—०००—

बुधवारीं सकाळीं येथील मिडल क्लास स्कुलांत मुलांस बक्षिसें वाटण्याचा समारंभ झाला. मुख्यस्थानीं क्या॰ बुलक डिपुटी कमिशनर होते. तसेच मि॰ डेविस साहेबही समारंभास आले होते.

—०००—

खानदेश रिलीफ फंड.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| रा. रा. मार्तंड कृष्ण हेडमास्तर इं. म. स्कूल सिंदखेड. | ५—०—० |
| मि॰ महमद अली हेड मास्तर हिंदुस्थानी शाळा सिंदखेड. | ३—०—० |
| रा. रा. गंगाधर गोविंद फर्स्ट असिस्टंट मास्तर इं. म. स्कूल सिंदखेड | २—०—० |
| रा. रा. गणेश शामराव सेकंड असिस्टंट मास्तर इं. म. स्कूल सिंदखेड | १—०—० |
| मि॰ अबदुल्लाशा असि॰ मास्तर हिंदुस्थानी शाळा सिंदखेड. | १—०—० |
| | १२—०—० |
| पुर्वी छापून प्रसिद्ध झाले ते | १८८—८—० |
| एकंदर रुपये. | २००—८—० |

सदरहू सर्व रुपये वसूल होऊन ऐक्यवर्धक सभेचे चिटणीस यांजकडे रवाना झाले.

बामन बाळाजी ओझरकर.

## वर्तमानसार

इंदुरास नारायणस्वरूप स्वामी गोविंद बाबा नाशिककर आले आहेत. त्यांनीं गेल्या आठवड्यांत कीर्तनासारखा नसूनच भाषणाचा थाट केला. आख्यान कर्ण पर्व होते. होळकर सरकार दर रोज त्यांच्या मुखांतून कांहीं तरी श्रवण करितात.

कलकत्ता ट्रामवेचें काम चांगलें चाललें आहे. उतारकरू पुष्कळ मिळून फायदा होत आहे.

दिलीत देवीची साथ मोठी आली आहे.

इराणचा नादशहा विलायतेस गेला आहे. त्याला हिंदुस्थानच्या खर्चानें मेजवानी होण्याचा बेत सालसबरींचा दिसत नाही.

लार्ड डडली यांस कोळशाच्या व लोखंडाच्या खाणीपासून गुदस्त सालीं ९० लक्ष रुपये नफा झाला.

पारीस शहरात ऐषआरामी पुन्हा सुरू झाली.

श्री. मल्हारराव गायकवाड यांस पुत्र नसल्यामुळें त्यांचें पित्त खवळलें आहे सबब कोणी ब्राम्हणानीं त्यांस असें सुचविलें कीं गांवांतील सर्व मुलांच्या डोकीचे केस काढून टाकले असतां पुत्र होईल व त्या सूचनेप्रमाणें बडोद्यांतील सर्व मुलांचे शाश्रू करण्याचा हुकूम झाल्याची कंडी उठली आहे. ही गोष्ट खरी असेल तर मोठाच चमत्कार आहे!!

इंदुरचे नवीन दिवाण साहेब दिवाणी फौजदारी वगैरे कायदे नवीन तयार करीत आहेत.

रा. रा. रामचंद्र आनंदराव उदास व रा. रा. रावजी वासुदेव टुलु यांस होळकर सरकारांनीं जडनाच्या जागा पत्करण्याविषयीं विचारिलें आहे.

इंदुरच्या बाजार सडकेवर कोणी सोनारानीं जात जेवण केलें व रस्ता खराब केला त्यास म्युनिसिपल कमिटीनें पांच रुपये दंड केला.

पुण्याच्या भाषण समारंभाला या वर्षी २६ बोलणारे आहेत असें कळतें.

दादाभाई नवरोजी यांस मल्हारराव गायकवाड यानीं ५० हजार रुपये बक्षिस दिले.

यज्ञ—ब्याकबेवर, पारशी लोकांच्या अग्यारीनजीक, मुंबईचे कित्येक भाटेय नाजरायी लोकांनीं मोठा यज्ञ मंडप घालण्याचे काम सुरू केलें आहे. यज्ञ करण्याचें कारण असें सांगतात कीं, ब्याकबेवर समुद्रापासून जागा घेतल्यामुळें समुद्र क्षोभला व जागा घेतल्यामुळें सहस्त्रावधि मासे वगैरे जीवजंतूंची प्राणहानी झाली. या दोन गोष्टीपासून जें पाप लागलें त्यामुळेंच मुंबईतील व्यापार नाहींसा होऊन या शहरास दारिद्रानें घेरलें आहे. ही स्थिति मोडून मुंबईच्या व्यापाऱ्यांची पूर्ववत चढती कला होण्याकरितां सदरहू यज्ञ होत आहे. गावांत अशी गप्प आहे कीं, यज्ञ प्रीत्यर्थ पन्नास खंडी आज्य फक्त हवनास लागणार. शिवाय यज्ञ सांगते करितां ब्राह्मणांच्या व जात बेवणावळीच्या पोळीस तूप उडेल तें निराळें. मुंबईची चढती कळा पुनः केव्हा येणार असेल ती असो. परंतु तूर्त या यज्ञापासून तूप महाग होईल इतकें मात्र होणार आहे.

मुंबईच्या कांहीं भागातील नरकाचें चनंदरावर साठवीत असतां हल्लीं कामाठपुऱ्यात साठवितात म्हणून तो काढण्याविषयीं त्या पुऱ्यातील लोकांनीं, मुंबईचे म्युनिसिपल कामिशनर, यांस, हायकोडतांत फिर्याद चालवूं म्हणून नोटिस दिली आहे.

परभू विधवा व परभांच्या पोरक्या मुलांच्या संरक्षणाकरिता एथील परभु लोक फंड जमा करित आहेत. सुमारें २४०० रुपयें मागल्या अदितवारीं जमा झाले.

हिंदुधर्मशास्त्र—बंगालच्या हायकोडतानें हिंदुधर्म शास्त्राविषयीं नुकताच असा ठराव केला आहे कीं, एक हिंदु मरण पावला त्याच्या मागें त्याची विधवा व दोन अज्ञान मुले व एक मुलगी होती. मरणाऱ्या हिंदूनें मृत्युपत्र करून ठेवलें होतें त्यांत असें होतें कीं सर्व स्थावर व जंगम मिळकत बायकोस दिली असून तीसच मिळकतीची एक्झिक्युटर नेमलें. हायकोर्टानें असा ठराव केला कीं, विधवा मिळकतीची कुलमालक असून तीस ती विकण्याचा अधिकार आहे. मुलें मिळकतीचें वारस नाहींत असें मृत्युपत्रांत स्पष्ट लिहिलेच पाहिजे असें नाहीं.

सिंधच्या सरहद्दीवरील रानटी लोकांनीं ब्रिटिश सरकारच्या रयतेस त्रास वगैरे देऊं नये हाणून बंदोबस्त ठेवण्याकरिता इंग्रज सरकार खेलातचे खान यांस दर वर्षास ५०,००० रुपये देतें. परंतु इतके रुपये पुरत नाहींत हाणून या पुढें खान यांस १,००,००० रुपये देण्याचा सरकार विचार करीत आहे. खेलतचे खान खेरीजकरून दुसऱ्या दोन रानटी जातीच्या मुख्यांस प्रति वर्षीं बत्तीस हजार रुपयें द्यावे लागतात. ने. ओ.

## पुण्यांतील जनरल हळदी कुंकू

(ज्ञानप्रकाशांतून)

पुण्यांत एक " पुणे विचारवती स्त्री सभा " हाणोन सभा झाल्यास बरेच दिवस झाले. त्या सभेचे नेम छापून प्रसिद्ध झाले ते समयीं पुणे ज्ञानप्रकाशात व मुंबई येथील हिंदु रिफार्मर पत्रांत व दुसरे एक दोन पत्रांत मजकूर आला होता. त्या पुढें याजबद्दल ज्यास्ती काम चालल्याचा मजकुर वर्तमानपत्रांत आला नाहीं. कारण हें स्त्रियांचें काम फार जपून चाललें पाहिजे तेव्हा जे करणे तें फार थंडाईनें होत आहे. परंतु या संबंधानें थोडे बहूत चालू आहे त्यां पैकीं चैत्र वद्य १३ शुक्रवार ता० २५ एप्रिल सन १८७३ रोजीं सर्व स्त्रियांचे हळदी कुंकू झालें. तें जाहीर समारंभानें झाले. याचा सर्व मजकूर कळण्याकडे लोकांचें लक्ष्य लागण्यासारखें आहे. या कारणानें त्याचा मुळापासून सर्व इतिहास कळवित आहों.

सभेचा उद्देश वयस्कर स्त्रियांत कांहीं सुरक्षितपणा उत्पन्न व्हावा हा आहे. हें कृत्य साधण्यास जरा अवघड आहे तथापि या सभेकडून ज्या गोष्टी घडल्या त्याची हकीगत पुढें लिहीत आहों.

हल्लीं बहुतकरून धर्म स्त्रियाकडून ही पुरुषांत होत आहे. कितीएक सुवासिनी व विधवा गरीब असल्या तरी स्वस साह्य होण्याकरिता धर्म करावा अशी पुरुषांस वासना नाहीं इतकेंच नाहीं परंतु बायकांस देखील कधीं इच्छा होत नाहीं. ती इच्छा उत्पन्न होण्याची तजवीज चालविली त्यात प्रथम एक पेठ काळेबावर येथे ब्राम्हणाची विधवा मयत झाली. ती जिवंत असतां तिचे जिनगीचे वहिवाटदार रावबहादूर सदाशिव बल्लाळ गोडे नेमले होते. त्यांनीं त्या बाईस उत्तेजन देऊन तिचे जिनगींत तिचें उत्तरकार्याचा खर्च झाल्यावर बाकी राहिलेल्या जिनगीचा धर्म बायकांत करावा असा अधिकार घेतला होता. त्याप्रमाणें राहिलेलें द्रव्यांत जाहीर समारंभ करून गरीब सुवासिनीस पातळें व चोळ्या व विधवांस पातळें दिलीं.

या प्रमाणें एक सोमवती पौर्णिमेस रा. गणेश वासुदेव जोशी यांणीं आपले मातोश्रीकडून एकशें आठ पातळें व चोळ्याचे खण गरीब सुवासिनीस व कांहीं पातळें विधवांस वाटलीं.

कितीएक गरीब बायकांवर फौजदारी खटले येतात. त्यांस बायकास पैसा देऊन वकील करण्याचें सामर्थ्य नसल्याकारणानें त्यांजला वकिलाची मदत मिळत नाहीं ती मदत धर्मार्थ मिळण्याचा क्रम रा. गणेश वासुदेव जोशी वकील यांणीं चालविला आहे.

दिवाणींत गरीब स्त्रियांचे अन्नवस्त्राचे वगैरे मोकदमे असतात व ज्याजला वकील करण्याचें सामर्थ्य नाहीं त्यांजला मदत वकील मजकूर हे करीत असतात.

पुण्याचे एजंट व जज्ज मेहेरबान पेनी साहेब बहादूर यांस वयस्कर स्त्रियात कांहीं ज्यास्ती ज्ञानाची वृध्दी व्हावी या हेतूनें खालीं लिहिलेल्या दोन गोष्टी सूचविल्यांत आल्या आहेत.

१. लहान मुलांचे वहिवाटदार स्त्रियांस नेमण्याचा प्रसंग येईल तेसमयीं त्या वहिवाटदार स्त्रीस लिहितां वाचतां येतें किंवा नाहीं याची चौकशी करून लिहितां वाचतां येणारे स्त्रियेस बहुतकरून वहिवाटदार नेमण्याची तजवीज ठेवणें.

२. ज्या स्त्रिया शिक्षा होऊन तुरुंगांत आहेत व जातात त्यांचे हातून दुसरी मजुरी करविण्याचे बद्दल लिहिण्या वाचण्याची मजुरी घेण्याची तजवीज करणें.

गेले कार्तिक मासात एक महिनाभर पेंठ काळेबावर येथील विष्णुमंदीरात सकाळचे काकड आर्तीचा समारंभ होत होता तेसमयीं आरत्या व पदें वगैरे ईश्वर स्तुतीचीं सर्व बायकांनीं हाणण्याचें चालूं केलें. त्यांत एक सातारकर वृध्द बाई आली होती. त्या बाईनीं एक महिनाभर तो समारंभ साजरा केला सदर्हू बाई कीर्तनाप्रमाणें उत्तम रीतीचीं पदें हाणत असे. त्यासमयीं फक्त बायकांनींच यावें असा नेम होता, व बायका सुमारें शंभर पर्यंत असत.

स्त्रियांचें सार्वजनिक मेळाचें कृत्य कांहीं पुण्यांत व्हावें तें पुण्यकारक आणि अनादि सांप्रदायास अनकूलतेचें असावें असे योजनेचा विचार चालला. त्यांत

चैत्र मासाचे हळदीकुंकू करण्याचा विचार ठरला. या गोष्टीस प्रथम सल्ला रावबहादूर माधवराव गोविंद रानडे यांणीं देऊन अंतःकरणपूर्वक सदर्हू कृत्य सुरक्षित होण्याच्या ज्या योजना होत्या त्या सुचवीत गेले. तो समारंभ पेठ काळे बाग येथील विष्णु मंदिरांत चैत्र वद्य १३ शुक्रवारीं अति उत्तम रीतीनें झाला.

हा समारंभ करण्यापूर्वी पुण्यांतील सरदार व संभावित लोकांचे वयस्कर स्त्रियांचा अभिप्राय घेतला. तो अनुकूल त्यांचा पडल्यावर या समारंभाबद्दल पुणे येथील वर्तमानपत्रांत जाहिरात दिली. व बोलावण्याच्या चिठ्या पाठविल्या त्यांवर सौ. सरस्वतीबाई भ्रतार रावबहादूर सदाशिव बल्लाळ गोंडे व सौ. सरस्वतीबाई भ्रतार गणेश वासुदेव जोशी यांच्या सह्या होत्या व शिवाय मोठाल्या लोकांकडे पाठवून बोलावणीं केल्यामुळे सर्व लोकांस तें कृत्य फार स्तुत्य वाटून सर्व स्त्रियांनीं तो समारंभ उत्तम साजरा केला.

सर्व जातींच्या स्त्रिया हळदी कुंकू घेण्यास आल्या होत्या. ज्या जातीस शिवण्याचा प्रतिबंध आहे तसे जातीस हळदी कुंकू भिक्षुकाद्वारे गंगाजळ घेऊन दिले. एकंदर बायका सुमारें ५००० जमल्या होत्या. या कृत्यास सुमारे १०० रुपये खर्च झाला. त्यास मदत खालीं लिहिल्याप्रमाणें मिळाली:— रु.

श्री० गंगा० गोदावरीबाई ऊर्फ आईसाहेब भ्रतार गंगाधरमाधवराव रास्ते दुसरे प्रतीचे सरदार.......... २०
श्री० गं० उमाबाई ऊर्फ बाईसाहेब भ्रतार विश्वास खंडेराव रास्ते दुसरे प्रतीचे सरदार.............. ५
श्री० गं० ताई साहेब भ्रतार बाबासाहेब मेहेंदळे दुसरे प्रतीचे सरदार ५
श्री० गं० रखमाबाई ऊर्फ ताईसाहेब भ्रतार पांडुरंग बाजीराव फडके दुसरे प्रतीचे सरदार.............. ५
श्री० गं० सरस्वतीबाई ऊर्फ ताई साहेब भ्रतार यशवंतराव माधव रास्ते दुसरे प्रतीचे सरदार........ ५
श्री० गं० जानकीबाई ऊर्फ बाईसाहेब भ्रतार श्यामराव लक्ष्मण रास्ते दुसरे प्रतीचे सरदार.............. ५
श्री० गं० आनंदीबाई ऊर्फ ताई साहेब भ्रतार विनायकराव हशमनीस तिसरे प्रतीचे सरदार.............. ५
किरकोळ बायकांकडून.......... ५
श्री० रा० गणपत देव महाराज संस्थान चिंचवड.......... ५
रावबहादूर सदाशिवराव बल्लाळ गोंडे १०
रा० रा० गणेश वासुदेव जोशी... १०
रावबहादूर माधवराव गोविंद रानडे ५
रा० रा० गंगाधर विश्वनाथ गोखले ५
रा० रा० बाळाजी महादेव जोशी १
किरकोळ पुरुषांकडून.......... ४

सदर्हू समारंभांत हळद कुंकू व ओट्या वगैरे भरण्याकरितां खालीं लिहिलेल्या स्त्रियांनीं फार मेहनत घेतली.

सौ० रमाबाई भ्रतार रा. ब. माधवराव गोविंद रानडे.
सौ० राधाबाई भ्रतार कृष्णाजी वासुदेव जोशी वकील.
सौ० भागीरथीबाई भ्रतार रावसाहेब गंगाधरराव विश्वनाथ गोखले.
सौ० लक्ष्मीबाई भ्रतार रावसाहेब दिनकर धोंडदेव दातार.
सौ० सरस्वतीबाई भ्रतार रावबहादूर सदाशिवराव बल्लाळ गोंडे.
सौ० वेणूबाई भ्रतार प्रभाकर विनायक भावे
सौ० उमाबाई भ्रतार शिवराम कृष्ण गोखले वकील
सौ० उमाबाई भ्रतार सिद्धेश्वर शास्त्री बर्वेकर.

सदर्हू स्त्रियांनीं व यांशिवाय पुष्कळ स्त्रियांनीं अंतःकरणपूर्वक आपले घरचे कार्यास इतके झटणार नाहींत असे रीतीनें मेहनत करून कार्य सिद्धीस नेले या सर्व कार्याचा मुख्यत्वेंकरून देखरेखीचा बंदोबस्त रा० गणेश वासुदेव जोशी यांची मातोश्री गं० सावित्रीबाई सरकारी पेनशनर भ्रतार रावसाहेब वासुदेव शिवराम जोशी सदर अमीन यांनीं फार उत्तम रीतीचा ठेविला होता.

हळद कुंकवाच्या जागांचा सर्व रीतीनें देखावा उत्तम होता. बत्त्या लाविल्या होत्या. दिवे व रस्त्यांतून झाडांच्या पानांच्या हिरव्या कमानी व कारंज्यांची कारंजीं लावलीं होतीं व ह्या हळदी कुंकाचा निमित्तानें देवळांत शेत केल्यामुळे पुढील अंगाचे पाण्याचें हौद अगदीं भरले होते. बागेचा देखावा चांगला दिसत होता.

येवढा मोठा समारंभ व स्त्रिया अलंकार घालून लहान मुलांसुद्धां आल्या असून कोणाची काहींएक वस्तू गेली नाहीं व शरीरास धक्का देखिल लागला नाहीं. देवळाचे आंतील सर्व बंदोबस्त बायकांनीं केला होता. देवळांत पुरुषांस जाऊं दिले नाहीं. रस्त्यावर बंदोबस्त पुरुषांकडून होता. रस्त्यानें पुष्कळ पुरुषमंडळी ह्या समारंभाचा थाट पाहण्यास आली होती परंतु रस्त्यांत अगदीं गर्दी न होऊं देतां जात येत होती.

ब्राह्मण जातीखेरीज इतर जातीचे बायकांस चांगले असून हळद कुंकू मिळण्याचा पूर्वी अनुभव नव्हता यामुळें थोडा अनुभव पाहून इतर जातीच्या स्त्रिया फार उशीरा येऊं लागल्या यामुळें रात्रीं दहा वाजेपर्यंत बायका येऊन हळदी कुंकू देण्याचें काम चाललें होतें.

सदर्हू प्रमाणें हळदी कुंकाचा समारंभ कोल्हापुरास महाराज सरकारांतून श्रीअंबाबाईचे देवळांत होत असतो व बाईसाहेब रास्ते यांजकडून होत असे व पुणें शहरासारखे मोठे शहरांत असे रीतीचा समारंभ झाल्याचें उदाहरण हें पहिलेंच आहे. ही गोष्ट फार महत्वाची आहे. स्त्रियांत ज्यास्तीं प्रेम उत्पन्न होऊन काहीं एखादे काम त यश येण्याचा मार्ग दिसतो.

हिंदुस्थानांतील बायकांत काहीं सुशिक्षितपणा व्हावा अशी ज्या सद्गृहस्थांची इच्छा असेल त्यांणीं स्वधर्माचें रक्षण करून पूर्वीचे संप्रदायास विरुद्ध नाहीं अशा काहीं कृत्यास सार्वजनिक रूपानें नमस्कार स्त्रियांस उत्तेजन देऊन करविलीं असतां त्यापासून अनेक रीतीचे फायदे देशास होतील असा अनुभव दिसत आहे. याविरुद्ध कसाही प्रश्न होईल तरी त्याबद्दल यश येणें कठीण पडून जें काहीं थोडें बहुत प्रेम आहे तेंही लयास जाईल, याकरितां सुज्ञ लोकांनीं याजवर लक्ष द्यावें.

हल्लीं पुण्यांत स्त्रियांस धर्मसंबंधाची व्यवस्था राहून औषधें मिळण्यास जरा अडचणीचा प्रकार असल्यामुळें हल्लीं नवीन दवाखाना शनवारांत जो डाक्टर विनायकराव लिमये यांचे नांवाचा काढला आहे त्यांत धर्मानिष्ठेचा पक्का बंदोबस्त ठेऊन बायकांस औषधें मिळण्याची उत्तम सोय केली आहे व या दवाखान्यांत बायकांस बसण्यास निराळी जागा नव्हती याजकरितां नवीन एक जागा बायकांस बसण्याकरितां डाक्तर मजकूर यांचे इष्टेटीचे वहिवाटदार रा० दामोदरपंत गोखले व गणेश वासुदेव जोशी यांणीं बांधविली आहे.

प्रथम ही सभा झाली ते समयीं पुण्यांतील कोणीही स्त्रिया आपलीं नांवें प्रसिद्धीस आणण्यात इच्छित नसोन असें काम ती फार अडचणी होत्या. ते समयीं रावबहादूर सदाशिव बल्लाळ गोंडे यांणीं व त्यांच्या पत्नी सौ० सरस्वतीबाई यांणीं धैर्य करून आपले नांव या सभेचे चिटणीस म्हणून प्रसिद्ध केलें. त्या कारणानें ही सभा स्थापन झाली आणि त्या सभेकडून काहीं विशेष म्हणण्यासारखीं कृत्यें झालीं नाहींत तथापि या गोष्टीचे एक विचाराचें ठिकाण झालें आहे. तेव्हां हा उपकार या उभयतां स्त्रीपुरुषांचा समजला पाहिजे.

मिती चैत्र वद्य १३ शके १७९५.

गोदावरीबाई भ्रतार गंगाधरराव माधवराव रास्ते दुसरे प्रतीचे सरदार.

## नोटिसा.

नोटिस—रा. रा. देवकरण मुलतानचंद दुकान पिंपळगाव तालुके जळगाव यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस दिली जाते कीं, माझे नवऱ्याकडे कर्ज असल्याचे फडींत पांच वर्षामागें मी तुम्हांस भानोर एथील सर्वे नंबर १९०व २१९ हे बाहाण्यास दिले असून व्याज बद्दल खत तुम्ही सर्व कागदावर करून घेतलें आहे तुमची साल पुरीं झालीं आणि एक सालचें विकही भरून घेतलें हल्लींचे सालाकरितां मी माझे शेतांत पाठविले असतां तुम्ही मना केले. आणि लोकांशीं म्हणतां कीं, हीं शेतें खरेदी घेतलीं आहेत. त्यास नोटिशीनें कळवितें कीं, आपणास ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत सदरहू शेताबद्दल लेख वगैरे असतील ते जळगावीं बाळकृष्ण सदाशिव फडके यांजला दाखवीन जर न दाखविल्यास मी शेताची वहिवाट करण्यास जाईन आणि तुम्ही मना केले तर कायद्यान्वयें फिर्याद करीन हें लक्षांत ठेऊन माझीं शेतें आपण सोडावीं आणि मजला पावती रुपये पावल्याबद्दल द्यावी. इतकेंही न केल्यास नुकसानी बद्दल एकंदर दावा केल्यावर आपले सारखास नाईट आहे कळावें तारीख २२ माहे एप्रिल सन १८७३ इसवी मुक्काम जळगाव.

(सही) रामजी वल्लद राघो धनगर अंगठा तयार निशाणी मातोश्राची नांगडी

नोटिस—रघुनाथ मुता ना... कान फळेंम गल्हाण तालुके ना... ठाकूरदास खेमराज दुकान ... तालुके बाळापूर याजकडून नोटि... त येते कीं, तुम्हाकडे खातेबाकी व्याजासुद्धा ४५० रुपये शेपन्ना... यावयाचे आहेत. त्याबद्दल दोन वेळां भवान पाठवून तुम्हाला तगा... ला असतां तुम्ही येऊन रुपयांचा फडा केला नाहीं. व हिशेबही रुजू... नाहीं.. त्याबद्दल मुद्दाम ही नोटिस दिली आहे तर नोटिस पोंचल्यापासून... दिवसांचे आंत आमची बाकी चुक... रावी. किंवा हिशेब रुजू करा... दोहींतून कांहींच तुम्ही न क... वर फिर्याद करून कोर्टखर्चासुद्धा नोटिशीचे खर्चासुद्धां सर्व रुपये भ... तले जातील कळावें. तारीख १९ एप्रिल सन १८७३ इसवी

(सही) ठाकूरदास खेमराज ... आलेगाव तालुके बा...

नोटिस अमृता कोटळ्या वणजा... इणार माहशुर तालुके बाशिम या... कूरदास खेमराज दुकान आलेगाव ता... के बाळापूर याजकडून नोटिस दे... येते कीं, तुम्हाकडे खातेबाकीबद्द... जसुद्धां दाद सा १५० रुपये ... आहे. तिजबद्दल दोन तीन वेळां ... पाठवून तगादा केला असतां तुम्ही... न रुपयांचा उलगडा केला नाहीं. ... शाही रुजू केला नाहीं. त्याबद्दल ... ही नोटिस दिली आहे तर नोटिस ... त्यापासून १५ दिवसांत आमची ... चुकती करावी किंवा हिशेब रुजु क... या दोहोंपैकीं कांहींच न केल्यास तु... दिवाणी कोर्टांत फिर्याद केली जाई... कोर्टखर्च व नोटिशीचा खर्च सुद्धां ... पसून भरून घेतला जाईल. कळा... तारीख १९ एप्रिल सन १८७३ इ०

(सही) ठाकूरदास खेमराज दु... आलेगाव तालुके बाळ...

नोटिस—सर्व लोकांस कळवि... त येते कीं, अकोल्यास इच्छाराम बं... कटलाल या नावाची दुकान होती त्यापासून अतिशय तोटा आल्यानें दुकान बंद करणे भाग पडलें त्या दु... नांत वहिवाटदार हरि नारायण पांडे हे नावापुरतेच आमचे हिस्सेदार होते व ना... ना गुमास्ते या दोघांकडून काम चा... होतें हल्लीं तें दुकान सर्व प्रकारें मह... केलें. हरि नारायण व नाना गुमास्ते जर या दुकानाबद्दल बसून देऊं ... न कर्ज घेऊं नये. किंवा कर्ज देऊं ... किंवा हिशेब वगैरे वर यांच्या सह्या घे... नयेत घेतल्या तर आम्हांस कबूल नाहीं... याउपर या दुकानासंबंधीं कांहीं ए... कोणताही व्यापार या दोघांशीं के... असतां आम्ही मालक तो कबूल करण... र नाहीं तारीख २६ माहे एप्रिल सन १८७३ इ०

(सही) इच्छाराम बंकटलाल दस्तुर ... इच्छाराम

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांनी वऱ्हाडसमाचार छा. छा. ...

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० ११ मे सन १८७३ इ० | अंक १९

## जाहिराती.

### ...ऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| ...चे आगाऊ | ६ |
| ...अखेर | ७ |
| ...कळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| ...चे आगाऊ | १०८ |
| ...अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| ...ठी, दर ओळीस | ०१०६ |
| ...च नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| ...लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ..., दुसरे खेपेस | ०२ |

### ...हत्संहिता (वराह संहिता)

व्यवहारांत इतर शास्त्रापेक्षां ज्योतिःशास्त्राची फारच अवश्यकता आहे. या शास्त्रांत ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या त्याकाळीं अनुभवास येतात हे पुष्कळांस माहित आहे; परंतु तें गूढार्थ असल्यामुळें साधारण मनुष्यास समजण्याची फार अडचण पडते. या शास्त्राचे गणित, होरा आणि शाखा, असे तीन स्कंद असून त्यांपैकीं प्रथमचे दोन स्कंदांवरील ग्रंथ इकडे बरेच प्रचारांत आहेत तृतीय स्कंधांतील गोष्टीचा. राजापासून रंकापर्यंत सर्वांस व्यवहारांत विशेष उपयोग असतां त्याची प्रसिद्धी कमी यामुळें व्यवहारास अवश्य लागणाऱ्या पुष्कळ गोष्टी लोकांस समजत नसल्या मुळें नुकसान होते. या स्कंधावर वराहमिहिरकृत बृहत्संहिता, या नांवाचा अनुभविक जुनाट ग्रंथ आहे. त्याच्या प्रती फारच थोड्या असून, समजणारेही विरळाच मिळतील याचें कारण हा ग्रंथ संस्कृत असून आंतील गोष्टी प्रचारांतील नव्हत. यामुळें साधारण व्युत्पन्नासुद्धां समजण्यास फार कठीण पडते. यास्तव याची प्राकृत टीका करून हा ग्रंथ छापिला असतां, त्याचा सर्वांस बहुत उपयोग होईल. असें मनांत आणून, त्या ग्रंथाच्या कांहीं साटिक प्रती व कलकत्ता येथें छापिलेले मूळ अशी निरनिराळ्या स्थळांहून पुस्तकें आणून त्याची प्राकृत टीका संस्कृत टिकेच्या आधारानें करून हा ग्रंथ छापण्याची योजना केली आहे. (मूळ मोठ्या टाइपांनीं व टिका बारीक टाइपांनीं छापली जाईल) या उपयुक्त कृत्यास वर्गणीदार होऊन एतद्देशीय उदार व विद्वान व परोपकारी गृहस्थ साह्य करतील असा पूर्ण भरवसा आहे. या पुस्तकाचे १०७ अध्याय आहेत.

हा ग्रंथ पुरा होईपर्यंत याचा प्रति महिन्यास एक अंक छापिला जाईल. त्यांत मोठ्या तक्तीचे सांचाची चतुष्पत्री ३२ पृष्टे असतील, व सुमारे ८०० ग्रंथ होईल. प्रत्येक अंक वर्गणीदारांकडे पाठविला जाईल. दर अंकास आगाऊ किंमत ०८ आणे व हांशिला बद्दल अर्धा आणा पडेल.

मागाहून किंमत सर्व पुस्तक तयार झाल्यावर ठरवू. वर लिहिल्या प्रमाणें या पुस्तकाचे सुमारे १० अंक होतील असा अनुमान आहे.

हें पुस्तक ज्यास पाहिजे असेल त्यांणीं आमचे नांवें पोस्टपेड पत्रे पाठवावीं. किमती बद्दल टिकिटें पाठविणे झाल्यास अर्ध आणा दराच्या वर्तावळ्या सह पाठवाव्या.

या ग्रंथाच्या प्रती किती काढाव्या हें वर्गणी दाराची संख्या समजल्या वाचून ठरविता येत नाहीं. यास्तव वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं कृपा करून आम्हास पत्र द्वारा लौकर कळवावें म्हणजे प्रतीचा अजमास कळेल. पहिल्या अंकाचा आगाऊ पैसा जमा करणें तो एप्रिल अखेर केला पाहिजे.

पहिला अंक मे महिन्यांत वर्गणी दारांकडे रवाना होईल. व पुढें दर महिन्यास पाठविला जाईल.

या प्रतींचा खप बराच होऊन आम्हास उत्तेजन आल्यास संस्कृत टीके सह वराह संहिता पुस्तकें छापण्या विचार करूं. रत्नागिरी जगन्मित्र हापिस

ता० २७ मार्च सन १८७३.

जर्नादन हरि आठल्ये

जगन्मित्राचे मालक.

## नोटिस.

नोटिस—रा. आबाजी भैराळ वकील राहणार अकोलें यास गंगराम वलद बाबाजी सोनार राहणार अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मापासून च्यार तोळे सोनें नेलें त्या पैकीं आमची बाकी सुमारें ३० रुपये ०≡॥। तुह्माकडे यणे आहे ती देत नाहीं पुष्कळ वेळां मागितली. तुह्मी एक अशी तकरार सांगता कीं आमचा फौजदारी मुकदमा चालविण्या प्रीत्यर्थ आह्मी तुह्मास १९ रुपये इनाम देऊं केले आहे. ती सबब खोटी आहे. मुळी मुकदम्यांत माल सुमारें १२ रुपयांचा होता. त्यास पंनरीस रुपये इनाम कोणी कबुल करील असें सहसा होणार नाहीं. शिवाय तुह्मीस त्या मुकदम्या बद्दल जें द्यावयाचें तें तेव्हांच रोख दिलें आहे. तुमचे देणाल आह्मी मुळीच नाहीं याजकरितां नोटिस पोचल्या पासून आमचे सदहू रुपये शिरस्त्या प्रमाणें व्याजासुद्धां १५ दिवसांचे आंत द्यावे. न दिल्यास कायदेशीर तजवीज करून रुपये घेतले जातील व कोर्टताचा खर्च होईल तो तुह्मांस द्यावा लागेल कळावे तारीख ६ माहे मे सन १८७३ इसवी.

(सही) गंगाराम वलद बाबाजी सोनार

अकोला दस्तुर खुद

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नयें.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. एडिटर महाराज आपले सेवेंत अलिकडे हजर झालो नाहीं ह्मणून राग आला असेल तर रागाऊं नका. करा माफी. मजकूरास जागा देऊन द्या फेकून एके कोपऱ्यांत.

साहेबवाला मुनाकिन. मोठ्याचे गोठेपण. पीरजादे अबदुल हक्क साहेब एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांचें लग्न झाल्याबद्दल मागे कळले होते त्याजवर हें लग्न कसे प्रकारें झालें व काय खर्च झाला हा खुलासा नसल्यामुळें आपल्यास कळविलें नव्हते. हल्लीं असें समजते कीं, साहेब महशुक यांस एकंदर २०००० रुपये खर्च झाला. वऱ्हाडांत आणि स्वदेशीं नगर, नाशिक असे ठिकाणीं इष्टमित्रास खाना—शिपाई व हाताखालील नोकर लोक यांस पागोटीं देणे—गरीबगुरीब बगैऱ्यास आंगरखे, कुडतीं, आंगरख्यास चांदीचे बटण लाऊन देणें असे प्रकारें वाटून विवाह केला. असें लोक ह्मणतात. त्यास असे नेटीव कामगारांत इंग्लिश जाणणारे इतके खर्च करतील असें मला वाटत नाहीं. याणीं आपले स्वताहाचे लग्नास इतका खर्च केला तेव्हां पुढें याजला संतती परमेश्वर देऊन याहून पांचपट खर्च करण्याची उमेद येवो. ह्मणून परवरदीगार यांस दोनवाणी लीन होऊन, नमन करून आपणास ही विनंती करित असल्याप्रमाणें पूर्णता कराल्च. कळावे, तारीख १२ माहे एप्रिल सन १८७३ इसवी.

एक खबरदार.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. मी जातीचा भट आहे. सिव्हस्थ असल्यामुळें लग्न वगैरे होत नाहींत ह्मणून भिक्षुकी करण्याकरितां फिरत फिरत जळगांवीं भर दोन प्रहरीं आलो. मी तर उपोषित होतोंच परंतु जे अश्व मजपाशीं होते त्याजला पाणी पाजण्यास लेंड्या वेशीवर धर्मशाळावर गेलो तर महाराज काय विचारतां! शामभटाचे तट्टू चालणार एक दिवसांत अडीच कोस, तशांत उष्ण, पाणी पाणी करीत धर्मशाळाशी तोंड लाविलें न लाविलें तों एकाएकी त्याला गस्त येऊन दस्त होऊन जमीनीवर पडलें आही पहावें परंतु चवकशी करून उतरून पाणी पाहूं लागलो तों आंत हाडें, दात, पानें, शेवाळ बारीक बारीक कीटक व सर्व पाणी हिरवट दिसलें तेव्हां लाचार होऊन गांवांत येऊन घोड्यास पाणी पाजलें आतां या गावांत म्युनिसिपाल कमेटी आहे तर तिजला अशी विनंती करतों कीं, हल्लीं उष्ण काळ असोन जनावरांस रानांत पाणी मिळत नसेल. आणि असे खराब पाणी प्याल्यानें बरसातींत रोग जो उत्पन्न होत असतो तो असे पाण्यानेंच होतो. येवढ्या करितां असें धर्मशाळ भरणारे फुकट असले तर मग त्यांचा जोरा चालणार नाहीं. जर का इनाम असेल तर मग त्याजवर नजर राखा राखानीं फेका म्हणजे सर्वांस सुख होऊन तुमचे जनावरासही सुख होणार आहे कळावे लोभ करावा हे विनंती.

शामभट प्रवासी.

इलिचपूर क्यांटोनमेंट

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सर. गुडमार्निंग टु यू. एडिटरराव कां कसें काय आहे. महाराज, तुमची तर चैन आहेच परंतु आमचेवर तरी मेहेरबानी करा आणि खालील चार ओळीस आपले सुंदर पत्रीं जागा द्या.

आपणास माहितच आहे कीं, इलिचपुराजवळ जी छावणी आहे तिला परतवाडा असे ह्मणतात.

महाराज येथें परभू व ब्राम्हण कामगारांची पुष्कळ वस्ती आहे. सर्व परभू मंडळी सुमार्गानें व एकमतानें राहातें परंतु ब्राम्हण मंडळीनें फारच ताळ सोडिला आहे. रंडीबाजीबद्दल तर या मंडळीत असे नामांकित लोक आहेत कीं, त्यांची बरोबरी कोणाच्यानेंच करवणार नाहीं. येथील एक मिशाळ दीक्षित तर एका मुसलमान हाशीबरोबर रममाण झाले आहेत आणि माजलेल्या खिलारी बैलाप्रमाणें सर्व गावांत दंगा चालवित आहेत. व ते धर्मसंबंधानेंही इतके भ्रष्ट झाले आहेत कीं, त्यांची कोणी सावली ही घेऊं नये. हल्लींचे सरकारानें इतकी विद्यावृद्धी केली तरी जित्याचा स्वभाव मेल्याखेरीज जात नाहीं.

येथील शाळेंत पुष्कळ सुधारणा झाली आहे व लोकांची मनेंही शिकण्याकडे लागत चालली आहेत. पत्रकर्ते महाराज आपण जर येथील गैरचालीचे लोकांची रीत सुधारणेबद्दल खटपट कराल तर मी आपला फार आभारी होईन. आपणास दुसरे पत्रीं पुष्कळ हकीकत कळवीन व एक मुन्ना डुकरिणीची मजेदार गोष्ट सांगेन. पत्र विस्ताराची माफी असावी. सलाम आले कुम मुन्ना साहेब. तारीख ४ मे सन १८७२.

व. क. ड.

मुन्ना.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

नमस्कार हो नमस्कार एडिटर महाराज आपण खुशाल तर आहेच. आह्मी आपलेवरून मग ओळखतो म्हणजे आम्ही तर ख्याली खुशालीत आहो. व आमच्याविषयीं तुम्हास आणि इतर लोकांस थोडीसीं माहिती व्हावी एतदर्थ हो

न ओळी लिहितो त्या तुमचे येथे संकात छापा हो! आमची विलक्षण नका नाहीं सर आपले चरित्र आह्मास व इतर लोकांस कळावयाचें नाहीं.

महाराज आह्मास सरकारी नोकरी लागली व ती आह्मी बरेच दिवस केली. आह्मास २०।२५ पावेतो रुपये सरकारांतून कसे तरी मिळत होते. दर महिन्याच्या महिन्या आमचे हातांत २०—२१ रुपये रोख येऊं लागले तेव्हां आह्मास शोक करावासा वाटला. आज थोडा केला, उद्यां करितो करितां आह्मी पुरे शोकी बनलो. फार तर काय, परंतु सरकारी नोकरीवर त्या शोकामुळें फार त्रास आला; परंतु ईश्वर आमचा साधीन, आणि आमचे सुदैवानें एकदम आमचे यजमानास अशी बुद्धी दिली कीं, अमुक अमुक सरकारी कामगार फार शोकी बनल्यामुळें व त्याचे हातून सरकारचे काम चांगलें होत नाहीं; यामुळें त्यांस कामावरून काढून टाकावे. व त्यांजवर ते जे सध्यां शोक करीत आहेत ते पूर्ण करूं द्यावा. एडिटर महाराज आमचे यजमानानें आह्माला कामावरून दूर केल्याचा हुकूम आमचे हातीं पडतांच जो आनंद झाला तो तर सांगतां पुरवत नाहीं. आतां आह्मास आह्मी आरंभलेला शोक पूर्णपणें करण्यास सर्वथैव परवानगी आहे. व असें झाल्याबद्दल मी ईश्वराजवळ त्याचे मनःपूर्वक स्तवन करीत आहे. महाराज जरी आह्मास आमचे घरचे आई, बाप, बायको, भाऊ अथवा इतर लोक कोणी विचारीत नाहींत. तरी ज्या सद्गृहस्थानें आमचा आह्मास चाकरी लागल्यापासून स्वीकार केला आहे तो गृहस्थ तर आह्मास विचारीत आहे कीं नाहीं, तेवढेंच पुरे आहे आह्मी दुसऱ्याची काळजी करीत नाहीं. व आह्मास कोणाची जरूरी नाहीं आमचे गृहस्थाचे काय गुण वर्णावे? महाराज त्या गृहस्थानें आह्माला कधीं न सोडण्याविषयीं व आजन्मास त्यापासून मिळविलेल्या पैशानें खाऊन पिऊन चैन मजेनें आमचे पाशीं राहण्याविषयीं आह्मास सदर परवानगी दिली आहे. कां केवढी आपली चैन. आह्मास कशास पाहिजे सरकारी नोकरी. आह्मी त्याचीतच उद्धाराचे समजतो कीं ईश्वरानें आमचे करितां असा एक पुण्यप्राणी निर्माण केला आहे.

महाराज आह्मी एकटेच ह्या गांवांत आहोंत असें नाहीं आह्मास आमचे सारखा एक मित्रही आहे. आमचे तर मतापेक्षां शोक करण्याची मजल केली. आमचे मित्र आपले गृहस्थाबरोबर गांवोगांव हिंडत आहेत. त्यांनींही आह्मावर वरचढ केली ह्मणून आह्मी कांहीं रीतीनें त्यांना मागें टाकण्याच्या प्रयत्नांत आहों ईश्वर कृपेनें येत सिद्धीस जाईल तेव्हां खरें. कां एडिटर महाराज आह्मी आहोंत ना चैनी व शोकी! आमचें शोकाचें पत्र छापण्यास अनमान करूं नका हो, कळावें लोभ असावा हे विनंती.

वाशिम ता. ६ मे सन १८७३ इ.

आपला

"एक वाशिमकर
गड्डू शोकी"

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

आपण माझे मागें लिहिलेल्या चार ओळींस आपले सुंदर पत्रीं जागा दिलीत हें पाहून मनास फार आनंद झाला व त्याजमुळें उत्तेजन येऊन आज ही या खालील चार ओळी आपणाकडे पाठविल्या आहेत तरी त्यांस आपण आपले येत्या अंकांत जागा द्याल अशी आशा आहे. टपाल खातें. टपाल खात्यांत येथें किती अंधार व अव्यवस्था आहे हें तर सांगणेंच नको. पत्रें वाटणारे गांवांत दोन शिपाई आहेत त्यांत मुसलमान असून त्याजला मोडी अथवा इंग्रजी बिलकूल लिहितां वाचतां येत नाहीं. तो लोक सांगतील त्या प्रमाणे पत्रांची कागदीत लिहून घेतो एखादे दिवशीं कोणी न सांगितलें तर पोष्टाचे पत्र एक दोन दिवस अथवा कोणी त्यास तीं वाचून दाखवी पावेतों आपल्या पाशींच ठेवितो. अथवा कोण एका पाशीं तो नेईल तितकीं पत्रें त्यास देतो. नाटपेड पत्रें मात्र पैसा करितां ह्मणून बुध्या त्याचा कांहीं तलास करून ज्यांची त्यांजला देतो अथवा इसम सापडत नाहीं ह्मणून परत करतो. एकाद्या नावाचे दोन अथवा तीन गृहस्थ असल्यास त्या नावाचे कोणतेंही गृहस्थास देतो. मग तें त्याचें असो अगर नसो त्याजला पुसती मनुष्याची आळस नाहीं व घरेंही त्यास कांहींच माहित नाहींत. दुसरा शिपाई बरा आहे. ही शिपायांची स्थिति झाली. दुसरें असें कीं, अकोल्याची डाक कधीं रात्रीं ७ वाजतां कधीं आठ वाजतां व कधीं १० वाजतां याप्रमाणें येते. डाक अमक्या ठिकाणीं अमूक वेळेस यावी असा कांहीं सरकारचा ठराव नाहीं काय? असल्याच पाहिजे. मग असें कां होतें कांहीं समजत नाहीं. नंतर डाक येऊन दुसरे दिवशीं कधीं आठ वाजतां कधीं १० वाजतां कधीं दोन वाजतांही डिलेवरी होते. असें होण्याचें कारण कांहीं समजत नाहीं. आणखी दुसरें असें कीं, पोष्ट आफिसांत कोणी एक आण्याचीं किंवा अर्ध्या आण्याचीं १—२ अथवा ज्यास्ती तिकिटें मागण्यास गेला तर कधीं कधीं त्याजला १—२ तिकिटें मिळत नाहींत. लागत असल्यास ५ रुपयांचीं तिकिटें घेऊन जा असें मास्तर आणि कधीं कधीं तिकिटें पुढीच नाहींत असेंही सांगतात. एडिटर महाराज. जो गृहस्थ आपला कसा तरी निर्वाह करितो आणि त्यास एकच पत्र पाठविणें आहे. तर त्यानें प्रथम पांच रुपये तिकिटा करतां आणावेत तें काढून व आणून तरी त्यास इतकीं तिकिटें एकदम घेऊन तरी काय करावयाचें आहे. असें करण्यापासून लोक एकदम पांच रुपयांचीं तिकिटें घेतील आणि विक्री ज्यास्ती होईल असा आमचे पोष्टांतील अंमलदाराचा हेतु असेल तर तो फार अज्ञानपणाचा आहे असें मी समजतो फुटकळ तिकिटें दिल्यानेंच विक्री जास्त होण्याचा संभव आहे तरी मी आपले पोष्टा कडील हेडास असें सुचवितों कीं त्यांनीं लोकांस जितकीं लागतील तितकीं आणि हवी त्या दराचीं तिकिटें व पत्रें बरोबर वेळेंत मिळण्याची तजवीज करावी अशी आमची त्यांस विनयपूर्वक प्रार्थना आहे व ते त्याजकडे लक्ष पुरवितील अशी पूर्ण आशा आहे.

आपला मित्र

"लोकहितेच्छु"

# वऱ्हाडसमाचार.

मिती वैशाख शुद्ध १४ शके १७९५

## खेडेगांवचें टपाल.

बेळगांव जिल्ह्यांत पोष्टाचे सब इन्स्पेक्टर रा. रा. रामचंद्र गोरेश्वर बापट या नावाचे गृहस्थ आहेत. ते आपल्या खात्यात सुधारणा व्हावी व लोकांची सोय व्हावी यासाठीं मनापासून झटतात असें दिसतें. त्यांनीं सर्व लोकांच्या माहितीकरितां बेळगांवच्या वर्तमानपत्रांत एक पत्र छापविलें आहे त्यांत ते ह्मणतात कीं, तालुक्यांच्या व महालांच्या गांवांच्या खेरीज बाकीच्या मानानें प्रत्येक खेड्यास निदान चवथे दिवशीं तरी मालकाने हातीं लखोटा पोंचावा अशी तजवीज ठेविली आहे व टपालचे शिपायापाशीं टाकेकडी तिकीटाकरितां ठेविली आहेत लोकांची समजूत आहे कीं, तिकिटें लावलेला लखोटा पोंचत नाहीं पण शिपायापाशीं लखोटे वाटण्याकरितां दिले त्याचा व त्यानें खेड्याहून जमा करून लखोटे आणिले त्यांचा नावानिशी दाखला ठेवलेला असतो त्यावरून लखोटे गहाळ होत नाहींत व झालेल्याचा पत्ता लावण्यास कांहीं हरकत पडत नाहीं. अस्तु. लोकांचे लखोटे वेळेवर पोंचत नाहींत असें आमचे कानावर आलें आहे पण त्याविषयीं लोक कांहींच लिहीत नाहींत ह्मणून आह्मी समजतों कीं, सर्व सुरळीत चाललें आहे. त्यास पत्रें वेळेवर पोंचलीं नाहींत तर त्यांनीं पत्राचे कव्हरासहित आह्मांकडे अर्ज द्यावा व त्या अर्जाचे लखोट्यावर टपाल निरुपयोगी (?) पेड असें लिहावें ह्मणजे टिकीट लावावयास नको. तो अर्ज आह्मांकडे येतांच आह्मी त्याकडे लक्ष पुरवून बंदोबस्त करूं.

रा. रा. रामचंद्र गोरेश्वर यांची ही सूचना फार उपयोगाची आहे. व अशा प्रकारची माहिती आमचे वऱ्हाडांतील सब इन्स्पेक्टर स्थानिक वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करतील व लोकांचा बोभाटा मिटविण्याविषयीं उत्सुकता दाखवितील तर लोकांवर त्यांचे फार उपकार होतील. बेळगांव जिल्ह्यांत तालुक्यांहून चवथे दिवशीं पत्र कोणत्याही खेड्यास पोंचवें असा बंदोबस्त केला आहे ही मोठी गोष्ट ह्मणावयाची. आपल्या वऱ्हाडांतील खेड्यापाड्यांची मजेची गत ह्मणते कीं, तालुक्याहून दर आठव्या दिवशीं तरी आपलीं पत्रें आह्मास पोंचूं द्या पण तें त्यांच्या नशीबास येत नाहीं. दोन आठवडे कधीं कधीं तीन आठवडे त्यांचीं पत्रें त्यांना पोंचावयास लागतात व अशानें लोकांचा व सरकारचा तोटा होतो. फक्त आमच्या वऱ्हाडसमाचाराचे स्थानिक रजिस्टराचें बूक पाहिलें त्यांत पुष्कळ शेरे आढळतील कीं, वक्तशीर पोंचत नसल्यामुळें बंद झाले हा आमचा बराच तोटा आहे, शि पत्रांबद्दल सरकारचें दर आठवडी टिकिटांचें नुकसान झालें हा सरकारी तोटा आहे आणि लोकांस वर्तमान त्यात वर्तमानपत्रादिकांची गोडी देश सुधारणेस सहाय्य होण्यास अत्यंत आवश्यक आहे हा तोटाही सामान्य सबब याकडे टपाल खात्याचे अधिकारी लक्ष पुरवून त्यांनें नियम खेड्यांच्या टपालाबद्दल केले काय आहेत ते वर्तमानपत्रांतून सर्व लोकांकरितां एकदा प्रसिद्ध करतील तर ती त्यांची मेहेरबानगी समजली जाईल.

## वेदार्थ दीपक.

जुनागड येथें गुजराथी भाषेंत वेदा नांवानें एक मासिक पुस्तक निघण्यास सुरुवात झाली आहे. पहिला अंक प्रसिद्ध झाला त्यांत ऋग्वेद संहिता, उपनिषद, व वेदाचें गांभीर्य हीं प्रकरणें चालू केलीं आहेत. यांत प्रथम ऋग्वेदाच्या मंत्रांचीं पदें संस्कृत व गुजराथी अर्थासहित दिलीं आहेत. पुढें मंत्र आहे व शेवटीं गुजराथी भाषेंत सगळा अर्थ दिला आहे. हें काम सतत चाललें तर मोठें महत्वाचें व आर्य हिंदु लोकांची जुन्या काळची स्थिति कळण्यास मोठें आधारभूत असें होईल आहे. मराठींतही अशा पुस्तकांची आवश्यकता आहे सबब त्यांच्या आधा किंवा स्वतंत्रपणें कोणी विद्वान् व गृहस्थ पुढें सरसावतील तर देशकल्याणाची एक मोठी गोष्ट त्यांनीं केल्यासारखी होईल.

## वऱ्हाड

सालमजकुरीं इकडे अजून ह्मण सारखा उन्हाळा झाला नाहीं. व रोगराई नाहीं. पाण्याचा व चा उपद्रवाचा बोभाटा नाहीं, चा साथ आली ती ही शांत आहे बघून संतोष वाटतो. एलिचपुर जिल्ह्यांत मात्र येक दोन आगी मोठ्या लागून बरेंच नुकसान झालें.

—०००—

अकोल्याचे तहशिलदार मि० न हुतन मरण पावले असा रिपोर्ट णी हुजूर पाठविला होता तो खोटा रला असें करणाराचा हेतु काय ना न कळे!

—०००—

मि० पाडुरंग सखाराम उमरावती डिपुटी कमिशनरचे क्लार्क आफ धि यांजवरील प्रकरणाची चौकशी जू दिल्यापावेतो तहकूब केली होती ती ति

...कारणावर न टाकतां १९ वे तारखेस ...न्हा सुरू करण्याचा बेत झाला आहे असें ...रुकतों कामिटीने ही योजना पसंत केली असें आम्ही ऐकतों.

—०००—

अकोला डिपुटि कमिशनर आफिसा कडील लक्ष्मणराव नर्तीकाकरून हा या हेर यात्रागिरीस गेला असतां. नाहींसा झा ला. त्या बरोबर सुमार २५० रुपये हो रोख होते असें समजते.

—०००—

गुरुवारी तिसरा प्रहरीं अकोल्यास उत्तम पाऊस पडला तेणेकरून हवा गार झाली आहे.

—०००—

बुलढाणे जिल्ह्यातील गोपनखेड येथे पडलेला डाका मि० कपितान पोलिस इन्स्पेक्टर यांनी पकडल्यावरून त्यास त्या चे मेहनतीसाठी १०० रुपयांची तरवार व ५० रुपये रोख बक्षीस देण्याविषयीं शिफारस झाली होती ती पोलिसचे इन्सप क्टर जनरल यांनी मान्य केली. त्याच प्रमाणे दुसरे कित्येक गुन्हे पकडण्याचे कामीं पाटील लोक व कांस्टेबल लोक यांनी चांगली मेहनत केली म्हणून त्यास ही सर्टिफिकेट, पागोटें, व रोख रुपयें असें देण्याचा ठराव झाला आहे. व तो प्रसि द्ध समारंभ या महिन्याचे १४ वे तारखेस डिपुटि कमिशनर साहेब आपले कचेरीत करणार आहेत व तो पहाण्याकरितां गा वोगांवचे लोकांस येण्याविषयीं मि० गइट साहेब पोलिस सुपरिंटेंडेंट यांनी बोलाव णीं पाठविलीं आहेत.

—०००—

बुलढाणे जिल्ह्यात चिखली तालुक्यातील ...क मौजे हिवरे येथे दोन मनुष्यें ठार मारू न रस्त्यात पडलेलीं आढळलीं. त्यास मा रणारांचा अजून पत्ता लागला नाहीं तपा सास पोलिस सुपरिंटेंडेंट साहेब व मि० बाळकृष्णाजी पोलिस इन्स्पेक्टर गेले आहेत.

—०००—

अकोल्याच्या म्युनिसिपल कमिटीने श हरात पैसाचे पायखाने ज्या लोकांचे घरीं आहेत त्यांना नोटिस दिली आहे कीं तारि ख १० जूनचे आंत त्यांनीं ते पायखाने मातीनें बुजवून टाकावे व नियमाचे दु सरे पायखाने करावे. याबाबदींत आम्हीं आपला अभिप्राय पुढील अंकीं लिहूं.

—०००—

अकोल्यास गेल्या सोमवारीं गुरुवारीं व शुक्रवारीं असे तीन दिवस तीन खुनी कै दी फाशीं गेले व १९ वे तारखेस एक जाणार आहे. गेल्या महिन्यात खुनी ल टल्याचेंच पीक आलें होतें.

—०००—

खासगी पत्रावरून असें समजतें कीं, ता० ८ मिनहू रोजीं बडनेर नांवाच्या रेल्वेस्टेशनावर व त्याचे आसपास सुमारें १०—१९ कोसपर्यंत मोठें वादळ झा लें. व गारांचा पाऊस पडला व कित्ये क घरांची छप्परें नाहींशीं झालीं.

## जाहिरात

सर्व शेट सावकार वगैरे वगैरे लोक बस्ती उमरावती यांस खालीं सही करणा... इजकडून देण्यात येते कीं, माझा भ्रता... रीने कमाईने घर एक दुमजली खपरेल मौजे तारखेड पेठ उमरावती येथील घराचे मूळ उत्तरेस यास महादाजी पूर्वेस श्री बालाजाचें घर कढीरे लाल यांनी पूर्ण केलें तें—दक्षिणेस लाला दलालाचे घर, पश्चिमेस रस्ता. समोर शिताराम श्रा वगीचे घर—उत्तरेस रस्ता. समोर चिंता मण मंगीचे घर—याप्रमाणें हद्दीचें याज वर माझा लेकीस वंशाचा हक्क नतून मा झा नातू रुपीया याना लेक कलंदर हा सदर्हू घर माझा परवानगी खेरीज खरेदी देत आहे तर मझे कौवमाना पोतेंती सदर्हू घर कलंदर यास खरेदी देण्यास अगर लिहून ठेवण्यास कोणतें प्रकारें हक्क नाहीं याजकरितां माझा संमतीखेरीज सदरचें घर कोणी गहाण ठेवील किंवा खरेदी घेईल तर त्याची रक्कम कायद्याचे आधारानें सर्व बुडेल. सदर्हू घराचे खत रजिस्टर होण्यास येईल तर सब रजिस्टर या णी नजर ठेवावी एक अंक रजिस्टरास देणें ता० ५ मे सन १८७३.

[नि.] सईची निशाणी चुडी कार्शी बाई मर्द अमरुशी छतपुरे जात गवई इचे खुद्द हातची.

## नोटिस.

नोटिस—राजश्री दरपा मोनू यास खत्री राहणार खामगात यास खालीं सही करणार या नोटिसीनें असें कळवितो कीं तुमचे खामगाव येथील राहतें घर आमचे कडेस गहाण असोन तें घर तुम्हास सुमारे १२ महिने झाले तों दर महिना ३ रुपये प्रमाणें भाड्यानें राहण्यास दिलें आहे. त्याचे भाड्याचे रुपये ३६ बारा महिन्याचे झाले ते पाठवून द्यावे. आणि पुढें तुम्हा स त्या घरात राहणें असल्यास दर महि न्यास ५ रुपये प्रमाणें एक वर्षाचे आगा ऊ रुपये ६० द्यावे नाहीं तर घर खाली करून द्यावें. असें न केल्यास जालेल्या भाड्याबद्दल रुपये ३६ व घर खाली क रण्याविषयीं आम्हास दिवाणींतून तजवीज करणें लागेल.

तुम्हीं आम्हास मुदतीत खालचे कापसी चे दलालीबद्दल कागदपत्र लिहून दिला आहे त्याप्रमाणें नफाचे रुपये व हिशोब करून आम्हास दाखवावा अगर करून हिशोब त्याबद्दल न दाखवाल तर उक्त आगेचे हिशोब बदल रुपये ३०० आम्हास द्यावे.

तुमचे पूर्वी २ रुपये ५२० चे आहेत. त्याचा ही करार गुदरून गेला आहे. क रितां त्या पुरत्याबद्दल व्याजासुद्धां रुपये आणून द्यावे.

याशिवाय खातेवारी आमची तुम्हाक डून अखेर वद्य ३० पर्यंतची अजमास रुपये २०० निघत आहे तेही रुपये दाखल करावे.

सदर्हू तपशिलवार मजकुराची ही नोटिस दिली आहे तर याचा जबाब लवकर आम्हास दोन दिवसांचे आंत द्यावा न दिल्यास वर लिहिलेल्या सुचने वाहुकुम आम्हास रीतीप्रमाणें दिवाणी त तजवीज करणें लागेल हें खूब समजावें व त्याचा खर्च तुम्हास द्यावा लागेल व हल्लीं नोटिसीचा, रजिस्टर खर्च तुम्हास द्यावा लागेल. कळावें तारीख ८ माहे मे सन १८७३ इसवी.

(सही) नरनारायण संतुकराम

## वर्तमानसार

बडोदा रेल्वेची ट्रेन मुंबईहून सुरते स जात असता एक स्त्री बांधत इंजिनाखाली मृत्यु झाले.

मि० विनायकराव वासुदेव ओरिएंटल ट्रान्स्लेटर याची प्रकृती अजून दुरुस्त झाली नाहीं सबब ते दोन महिने रजा आणखी वाढीवणार आहेत.

महाराज दिली पार्सिंग नावाचे हि दुस्थानातील राजे विलायतेस आहेत त्यास पार्लमेंटामधें मेंबर नेमण्याचा विचार झाला आहे.

महाबळेश्वरास या वर्षी युरोपियन लो कांची फार दाटी झाली आहे. व स र बार्टल फ्रियर साहेब तिकडे गेल्या नें कित्येक नेटिव सरदारही महाबळेश्व रास त्यांना भेटण्यासाठीं गेले होते.

फ्रियर साहेब आतां विलायतेस गेले आहेत.

ता० २७ रोजीं अटक येथें काहीं सेकंद पर्यंत धरणीकंप झाला.

कलकत्ता येथें मागील रविवारीं दोन युरोपियन गाडींतून चालले असतां त्या च्या गाडीखालीं सांपडून एक मनुष्य मे ला पुढें त्यांनीं त्या मेताचे बायकोस ५० रुपये दिले. अस्तु गोऱ्यांचे सर्वत्र गोरें!!

मिट्रिक्युलेशन परिक्षेमध्यें पास झालेले ते :—

एल्फिन्स्टन् कालेजापैकीं.

माणिकजी दादाभाई अर्नाटी.
वासुदेव सदाशिव आपटे.
मल्हार भिकाजी बचसार.
दोराबजी हुरमजी मोदीवाला.
हरिराम उत्तमराम भट.
सदाशिव रामकृष्ण भाट,
अदरजी मनचरजी दलाल.
माणिकजी नसरवानजी दलाल.
फरदुनजी मनचरजी दस्तुर.
दौलतराव तुकाराम देसाई.
विठ्ठल विष्णु मोखले.
पुरुषोत्तम गोपाळ केळकर.
मेहरवानजी पेस्तनजी खार घाट.
जहांगीर पदमजी मोदी.
कृष्णाजी सदाशिव मुधळे.
गोविंद निळकंठ नेरकर.
रुस्तमजी धनजी भाय पटेल.
रघुनाथ शिवराम टिपनिस.
गोवर्धन माधवराम त्रिपाठी.
गोविंद वासुदेव टुळू.
टेकचंद उद्धवदास वैशाणी.
शिवजराम विश्वनाथ व्यास.
मेहरवानजी नसरवानजी वाडिया.

डेक्कन कालेज पैकीं.

रंभुचंद अनिलिडीकर.
शंकरराव जी आपटे.
रंगो बाळकृष्ण आपटे.
रामचंद्र श्रीधर चौबळ.
लक्ष्मण कृष्ण निपाळूणकर.
केशव गोविंद दांडे.
फिरोशा होसंगजी दस्तुर.
नारायण कृष्ण धारप.
सिद्धेश्वर भास्कर गोळे.
नारायण शिवराम गोरे.
गोविंद गोरेश्वर हसबनीस.
मैनंद गोपाळ इंदापुरकर.
गंगाधर हरी काळे.
रावजी बाळाजी करंजीकर.
विठ्ठल लक्ष्मण कवठेकर.
विष्णु रघुनाथ केळकर.
गोविंद नारायण क्षीरसागर.
रखमाजीराव राघवेंद्र लोकुरकर.
काशिनाथ बापू पाठक

फ्रीज. अ. इ.

कृष्णाजी बल्लाळ आपटे.
भिकूराघोबा देवनाळकर.

सेंटझेविअर्स कालेज.

लुइस डिसा.
रावर्ड केरी.
उलियम रावर्ट स्मियान्स.
नवरवानजी कावसजी मासानी.

पेशविण बाईचें मरण.—कैलासवासी श्रीमंत बाजीराव साहेब पेशवे याचे दत्तक नातू भट नानाच्या वंशातील राव साहेब पेशवे हे इंग्रज सरकारच्या हातानें फाशी च्या द्वारे कैलासवासी झाल्यावर त्यांची पत्नी रमाबाई ह्या काहीं एक दिवसांनीं निराधार होऊन होळकर सरकारच्या मुलखांत आल्या सबब होळकर सरकारांनीं उदार हस्तानें यांची आजपर्यंत बरदास्त ठेविली होती. दरमाहा सुमारे ६२० रुपये देत जाऊन शिवाय नोकर चाकर वगैरे यांच्या येथें ठेविले होते त्या कारणानें त्या बाईसाहेबांनीं होळकर सरकार आप ल्याच कुटुंबातील आहेत असें समजून देत असलेल्या पैशांत निर्वाह करून आपल्या माहेरच्या कुटुंबासह तेथें रहात होत्या त्या तारीख १ माहे मजकूर रोजीं देहमुक्त झाल्या. ज्ञा. प्र.

—आन. टेकरसाहेब पुढच्या सोमवारी विलायतेस जाणार असें कळतें.

—मुंबईच्या प्रदर्शनाबद्दल सर्व खर्च जाऊन दोन हजार रु० शिल्लक राहि ली असें समजतें.

—मृत्यु— आम्हास दुःख वाटतें कीं, प ट्याळच्या महाराजांचे चिरंजीव युवराज गेल्या महिन्याच्या २७ व्या तारखेस प ट्याळा येथें वारले.

—डाकोर मठा यात्रांचा तंटा य ठाकुरद्वारात ब्राह्मणांतील पोटभेदांत म डनडीचा झगडा चालू आहे. सोनार ब्राह्मण, लोहार ब्राह्मण, तांबट ब्राह्मण, सुतार ब्राह्मण, हे कोंकणस्थ व कऱ्हाडे यांचे ब्राह्मण्य हिरावून घेण्याकरितां आ पले हातांडे, ऐरणी बाकस, फिकरी व गैरे घेऊन पुढें सरसावत आहेत असें आमचा सोबती सांगतो. अखेर काय होतें तें पहावें.

—जयपूरच्या गुजराती वाणगंगेवर घर

ण बंधून पाट करणार आहेत. या पाटबंधाऱ्यास एकंदर अजमासें तेरा लक्ष ६० लागतील.

—बायकांस राजकीय संबंधानें मुकत्यार निवडण्याचा अधिकार असावा ह्मणून कायद्याचा मसुदा पार्लिमेंट सभेपुढें आला होता तो नापास झाला.

—ह्मैसूर— या प्रांतांतील शाळांत उपयोगासाठी शेतकी प्रकरणीं देशभाषेंत ग्रंथ तयार करण्याची मद्रास सरकारानें परवानगी दिली.

—अमेरिकेंतील युनैटेड स्टेट्स येथें आजपर्यंत पुरुषच धंदे करित होते त्यांत स्त्रियांचा बराच प्रवेश होत चालला आहे. हल्लीं तेथें स्त्रिया डाक्टर ५१०, दंतवैद्य २४, वकील ५ आणि उपदेशक ६८ याप्रमाणे आहेत.

—मृत्यू— आह्मास लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं, वे. शा. सं. रा. रा. विठोबा अण्णा दप्तरदार यांस चैत्र वद्य ११ स कऱ्हाड मुक्कामीं देवाज्ञा झाली. त्यांच्या मरणाची बातमी ऐकून पुष्कळांस दुःख वाटेल. त्यांच्या चर्येवरूनच ते बुद्धिवान, चतुर व धूर्त आहेत असें दिसे, हें ज्यांनीं त्यांस पाहिलें आहे ते कबूल करतील. हे मुळचे गृहस्थ असून त्यांच्या अंगीं बहुश्रुतपणा, शोधकपणा व उद्योग हीं फार होतीं. हे संस्कृत कविताही फार उत्तम करित असत.

ई. प्र.

## मुंबईच्या वकिलीच्या परीक्षेंत पास झाले ते.

१. अचरलाल गोविंदलाल.
२. अनुपराम अमृतराम.
३. बापु मोरेश्वर हळवे.
४ बाळकृष्ण गंगाधर देशपांडे.
५. चिंतामण नारायण गोळे.
६. चिंतामण पांडुरंग लाटे.
७ चुनीलाल दलपतराम.
८. धोंडो जनार्दन करमरकर.
९. गोविंद नाराण डोंगरे.
१०. गोविंद विष्णू डांगे.
११. जव्हेरी लाल ललुभाई.
१२ जिवनजी हरिभाई देसाई.
१३. केशव रघुनाथ फडके.
१४ कृष्णाजी नारायण पाटणकर.
१५. कृष्णाजी सिद्धेश्वर देव.
१६. कृष्णमुख आत्माराम.
१७. लक्ष्मण आपाजी गोखले.
१८. नाडिपल्ल महिगन अनंत.
१९. महादेव हरी दलाल.
२०. मनसाराम शंकर.
२१. मणीलाल गोविंद राव.
२२. महर्जी कुवर्जी तारापुरकर.
२३. मोहनभाई गुलाबभाई,
२४. मोतीलाल माणीकलाल.
२५. नागरजी त्रिकमदास.
२६. नारायण परशराम टिळू.
२७. नारायण विनायक बेलणकर.
२८. पांडुरंग नारायण उदास.
२९. रामचंद्र कृष्ण पर्वतीकर.
३० रणछोड रामभाई.
३१. सदाशिव कृष्ण गोरे.
३२. सदाशिव मैराळ वीरकर.
३३. साकरलाल मोतीराम.
३४. शिवलाल काशीराम.
३५. श्रीधर नारायण.
३६. सूरभाई त्रिकमदास.
३७. वामन महादेव बोडस.
३८. वासुदेव धोंडदेव केळकर.
३९. विनायक जनार्दन गानू.
४०. विश्वनाथ विनायक परांजपे.
४१. विठ्ठल महिपत कुळकर्णी.
४२. विठ्ठल रामचंद्र.

## कायद्याविषयीं माहिती

(ता. २७ ए० चे अंकावरून पुढें चालू.)

उपद्रवाचें शास्त्र—याजला आपत्यशास्त्री ह्मणतात. प्रत्येक मनुष्यास आपलें स्वतःचें कुटुंब, स्वतःची मालमिळकत, स्वतःचें शरीर, व स्वतःची प्रतिष्ठा किंवा अब्रू यांचा सांभाळ करण्याविषयींचा पूर्ण अधिकार आहे. व त्या अधिकारांत रंकापासून रायापर्यंत कोणासही प्रतिबंधक अशा रीतीनें हात घालण्याचा अथवा त्यांतून यत्किंचितें कमी करण्याचा बिलकूल अधिकार नाहीं. इतकेंच नव्हे पण कोणी लबाडीनें अथवा विसरभोळेपणानें ह्मणा तसें एखादें कृत्य करूं पाहील तर त्याजला आपले अधिकारांत आहे तितके व जरूर आहे तितकें शासन करण्याचाही अधिकार आहे. माझी ही हातांतील छडी आहे ही जर मी रस्त्यानें जात असतां कोणी हिसकून घेऊं पाहील तर मजला ही ती त्यापासून हिसकून परत घेण्याचा अधिकार आहे. ह्या माझा हिसकून घेण्यानें जर त्या दुसऱ्या मनुष्यास मोठा राग येईल अथवा अपमान झाला असें वाटेल तर काहीं चिंता नाहीं. व त्याच्या वाईट वाटण्याबद्दल मजकडेस काहीं दोष नाहीं. हेंच उदाहरण सर्वत्र लागू करावें.

वर जें आपलें शरीर, आपली मिळकत वगैरे संरक्षणाचा आपल्यास पूर्ण हक्क आहे ह्मणून सांगितलें या हक्कासही एक मोठा व फार जरूरीचा अपवाद आहे तो असा कीं, एकमेकांशी एक अशा दोन मिळकती निरनिराळ्या मनुष्यांच्या मालकीच्या असतील त्या ठिकाणीं त्या निरनिराळ्या मनुष्यांस जरी आपली मिळकत संरक्षण करण्याचा अधिकार आहे तरी त्यांच्या त्या संरक्षणाच्या रीतीनें एकमेकांचे मिळकतीस इजा होईल अशी कोणतीही कृत्यें करतां येत नाहींत. उदाहरण माझ्या इमारतीस लागून दुसऱ्याची बखळ जागा आहे. त्या दुसऱ्या मनुष्यास आपले बखळ जागेवर जरी पूर्ण मालकी आहे व तिचा तो हक्क त्या रीतीनें उपयोग करूं शकतो तरी माझ्या इमारतीस इजा पोंचेल अशा रीतीनें त्या बखळ जागेत खड्डा खणून बरसातीचें पाणी मुरून माझी इमारत खाली येईल असें त्याला करितां येत नाहीं. त्याचप्रमाणें दोन इसमांच्या जमीनी एकमेकांशी एक लागून आहेत तर ज्याला त्याला आपले जमीनींत जाण्याचा पूर्ण हक्क आहे; पण, एक दुसऱ्याचे शेतांत असलेलें पीक तुडवून जाईन ह्मणेल तर चालणार नाहीं. दुसरी एक गोष्ट येथें सांगणें जरूर आहे कीं प्रत्येक मनुष्यास व प्रत्येक समुदायास त्रासकारक अशी जर कोणी आपले मिळकतींत घाण करील तर त्या ठिकाणींही हें शास्त्र मध्यें पडून मनुष्यास किंवा समुदायास त्रास होणारें वर्तन मोडून टाकवील.

सारांश मनुष्यास आपले जीविताचें व संतती संपत्तीचें रक्षण करणें व तेणेंकरून आपल्या शेजाऱ्यास पीडा न देणें हें अवश्य आहे. याजविषयीं विचाराचें हें शास्त्र आहे. ह्या शास्त्रांत जे विषय आहेत ते अगदी जरूरीचे असून सर्वांच्या नेहमीच्या प्रचारांतील आहेत. वास्तव सविस्तर न लिहितां तात्पर्य सांगतों स्वतःचे शरीराचे संबंधानें ह्यांत विचार केले आहेत ते:—शरीर ही ईश्वरी देणगी आहे. व ह्याचें संरक्षण न्यायानें करावें. कोणी शरीरास इजा (उदाहरणार्थ अटकेंत ठेवणें घेऊं) कोणी कोणास अटकेंत ठेवलें असतां त्याजला सुटका करून घेणें कोण कोणत्या उपायांनीं विहित आहे हें यांत सांगितलें आहे. आतां अटकेंत ठेवणें ह्यांत दोन प्रकार आहेत. खासगी नात्यानें अटकेंत ठेविलें असतां प्रतिबंध झालेले मनुष्यास आपली सुटका आपल्या स्वतःचे सामर्थ्यानें होण्याजोगी असल्यास त्याणें बेलाशक करावी. जर तशी सुटका होणें शक्य नाहीं असलें तर सरकारची (येथें न्यायाचीं कोर्टें घेऊं) मदत घ्यावी ती मदत दोन प्रकारची. स्वतःस भोगलेले त्रासाचा मुबादला आणि अन्यायाचें कृत्य करणारास शासन. मुबादला मिळण्यास्तव दिवाणी कोर्टाचा उंबरठा चढलें पाहिजे आणि शासन करण्याकरितां फौजदारी कोर्टाशी प्रार्थना केली पाहिजे. ह्यांतही प्रथम मुबादला द्यावा किंवा प्रथम शासन करावें याजविषयीं विचार आहेत. कित्येक प्रसंगीं शासन प्रथम देऊन नंतर मुबादला मिळतो. कित्येक प्रसंगीं दोन्हीं प्रकारचे उपाय त्रासलेल्याचे इच्छेवर असतात. ज्या ठिकाणीं दोन्ही प्रकारचे उपाय असतात तेथें अमुक एक उपाय करणें भाग आहे असें न्यायाचें कोर्टास ह्मणतां यावयाचें नाहीं.

अधिकाराच्या नात्यानें अटकेंत ठेविलें असल्यास येथें स्वतःचें सामर्थ्य खर्ची घालतां कामा नये. (यांत इतकीच मती आहे कीं खासगी नात्यांत मनुष्यावर अधिकाराचा अमल सर्वकाळ असतो) तर त्रास पावलेल्यानीं न्यायाचे कोर्टाची मदतच घेतली पाहिजे. अशा ठिकाणीं न्यायाचे कोर्टानें पहावयाच्या गोष्टी इतक्या असतात—अटकेंत ठेवणें योग्य किंवा अयोग्य, आणि योग्य असल्यास कपिलेला अधिकार होता कीं नाहीं. प्रथमच्या मुद्याचा विचार करतांना अनुभवाच्या हकीकती पहाणें व दुसऱ्या मुद्याचे विचारांमध्यें हकीकतीचा व कायद्याचाही प्रश्न निघतो: इतकें, याज सांगण्यास विसरतां कामा नये कीं खासगी मनुष्यानें अटकेंत ठेविल्यास जो परिणाम होतो त्याहून कोणत्याही मानानें अधिकारासे मनुष्यानें अटकेंत ठेविल्यापासून होणारा परिणाम उणा नसतो. मुबादला आणि शासन मिळण्यास प्रतिबंध नसतो. दोन्हीं प्रसंगीं मुबादल्याचे रूपानें नुकसान मिळणें तें कोठें कोठें केवळ नावाचें असतें व कोठें कोठें नावाची आणि खरी झालेली अशीही नुकसानी असते. स्वतःचे अब्रूचे संबंधानें ह्यांत विचार केले आहेत ते:- मनुष्यमात्रास कमी किंवा ज्यास्ती अब्रू आहेच परंतु त्यांतच जसा मनुष्याचा द्रव्यानें, विद्वत्तेनें कुळानें आणि चांगणुकेनें आपले देशाशी संबंध वाढत जातो तशी त्याची प्रतिष्ठा वाढत जाते आणि प्रतिष्ठा जशी वाढत जाईल तशी त्याचे अब्रूची किंमत वाढत जाती इतकेंच नव्हे. इतर लोकांस त्याचें नांव घेणें तितकें नाजुक होतें. अब्रूची हानी होण्यास केवळ आपला स्वतःचा देहच कारण आहे असें संक्षेपानें मानूं नये. आपण, आपली स्त्री, आपला मुलगा इत्यादि कारणें आहेत. व त्यांपैकीं कोणा एकाच्या निंदास्पद कोणी बोलेल, लिहील, प्रसिद्ध करील किंवा नुस्ते हावभाव करून प्रदर्शित करील, तर त्याच्यावर काहीं एक प्रकारचे बोलणें पडेल. अब्रूच्या हानीचा मुबादला केवळ नुकसानरूपानें घेता येतो आणि त्याचप्रमाणें नुकसानीबद्दल पैसा आणि कृत्याबद्दल शासन असेंही मिळतें. आ[illegible] त्या स्त्रीशी कोणी ज्यार कर्म करून आपली अब्रू कमी केली असें जर कोणास वाटेल तर त्याजला ह्या अब्रूचे हानीबद्दल ज्यारकर्मी मनुष्यावर दिवाणी दावा करून अब्रूचा मुबादला मागतां येत नाहीं असा एक नियम आहे. अब्रूची हानी फक्त निंदास्पद खोटे अपवाद उठविल्यानेंच होती असें नाहीं. खऱ्या हकीकतीच्या प्रसिद्धीनेंही अब्रू जाती व तशा ठिकाणीं न्यायाधिशास पाहणें काय असतें तर त्या हकीकती जरी खऱ्या असल्या तरी त्या उच्चारणें सार्वजनिक हिताला इष्ट आहे कीं नाहीं? व खऱ्या गोष्टीनें अब्रू गेल्याचे विवक्षित प्रसंगीं न्याय करणें न्यायाधिशास मोठे जोखमीचें आहे. कारण सार्वजनिक हित ह्मणजे काय व सार्वजनिक हिताशी ह्या आरोपित मनुष्याचा संबंध आणि याजला तसा उच्चार करणें किती जरूर आहे या गोष्टीचा निर्णय करावा लागतो. तात्पर्य काय आहे कीं, प्रत्येक मनुष्यास त्याची अब्रू संरक्षण करण्याची पूर्ण मोकळीक ठेविली आहे. तथापि सार्वजनिक हिताकरितां एका मनुष्याची अथवा मनुष्यांच्या एका वर्गाची [illegible] गेली तरी परवा नाहीं. याचें मुख्य कारण इतकेंच दिसतें कीं, प्रत्येक मनुष्य देशाचा अंशतः मिळालें आहे. व देशाचें कल्याण करणें जितकें त्याचें अधिकारांत आहे तितकें त्याणें केलें पाहिजे. जर तो [illegible] करील तर कायदा त्याला भाग पाडील व कायदा भाग पाडील हें या वरील प्रकारावरून स्पष्ट होतें.

(पुढें चालेल)

हे पत्र अकोला एथें खंडेराव बाळ फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा.

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० २५ मे सन १८७३ इ० | अंक २१

## जाहिराती.

### ऱ्हाडसमाचाराची किंमत

| | |
|---|---|
| | रु. |
| ांचे आगाऊ | ६ |
| ळआतेर | ७ |
| ळकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| ांचे आगाऊ | १०८ |
| अंतर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| ाठी, दर ओळीस | ०।०६ |
| च नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| ग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### श्रीमद्विद्यारण्यकृत पंचदशी.

महाराष्ट्र व्याख्यसह.

चांगल्या वेदांतनिपुण विद्वानांनीं मान्य ऱ्ली आहे. कागद जाड, बांधणी सुख, मोठ्या सांचाची पृष्ठें ६०० ग्रंथ संख्या सुमारें तेरा हजार. किंमत रुपये ६ व टपालखर्च बद्दल ०।४ असें ६।०।४ ल पाठविले असतां पुस्तक रवाना होईल आगाऊ पैसा न पाठविल्यास फक्त सह्याच ज्या लोकांनीं पाठविल्या आहेत त्यांणींही जलदी करावी पुढें प्रत न मिळाल्यास आह्मी जबाबदार नाहीं प्रति फार थोड्या आहेत.

रघुनाथ शंकर.

मु. श्री. ज्ञान. प्रदीप कऱ्हाड.

### बृहत्संहिता (वराह संहिता)

व्यवहारांत इतर शास्त्रांपेक्षां ज्योतिःशास्त्राची फारच आवश्यकता आहे. या शास्त्रांत ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या यथाकालीं अनुभवास येतात हे पुष्कळांस माहित आहे; परंतु तें गूढार्थ असल्यामुळें साधारण मनुष्यास समजण्याची फार अडचण पडते या शास्त्राचे गणित, होरा आणि शाखा, असे तीन स्कंद असून त्यापैकीं पहिल्या दोन स्कंदांवरील ग्रंथ इकडे बरेच प्रचारांत आहेत तृतीय स्कंदांतील गोष्टींचा राजापासून रंकापर्यंत सर्वांस व्यवहारांत विशेष उपयोग असतां त्याची प्रसिद्धी कमी यामुळें व्यवहारांत अवश्य लागणाऱ्या पुष्कळ गोष्टी लोकांस समजत नसल्या मुळें नुकसान होतें. या स्कंधावर वराहमिहिरकृत बृहत्संहिता, या नावाचा अनुभविक जुनाट ग्रंथ आहे. त्याच्या प्रती फारच थोड्या असून, समजणारेही विरळाच मिळतील याचें कारण हा ग्रंथ संस्कृत असून यांतील गोष्टी प्रचारांतील नव्हत या मुळें साधारण व्युत्पन्नांससुद्धां समजण्यास फार कठीण पडतें यास्तव याची प्राकृत टीका करून हा ग्रंथ छापिला असतां, त्याचा सर्वांस बहुत उपयोग होईल असें मनांत आणून त्या ग्रंथाच्या कांहीं सटीक प्रती व कलकत्ता येथें छापलेले मूळ अशीं निरनिराळ्या स्थळांहून पुस्तकें आणून त्याची प्राकृत टीका संस्कृत टीकेच्या आधारानें करून हा ग्रंथ छापण्याची योजना केली आहे. (मूळ मोठ्या टाइपानीं व टीका बारीक टाइपानीं छापली जाईल) या उपयुक्त कृत्यास वर्गणीदार होऊन एतद्देशीय उदार व विद्वान् व परोपकारी गृहस्थ साह्य करतील असा पूर्ण भरवसा आहे, या पुस्तकाचे १०७ अध्याय आहेत,

हा ग्रंथ पुरा होईपर्यंत याचा प्रति महिन्यास एक अंक छापिला जाईल. त्यांत मोठ्या तक्तीचे सांचाची चतुष्पत्री ३२ पृष्ठें असतील, व सुमारें ८०० ग्रंथ होईल. प्रत्येक अंक वर्गणीदारांकडे पाठविला जाईल. दर अंकास आगाऊ किंमत ०८ आणे व हांशिला बद्दल अर्धा आणा पडेल.

मागाहून किंमत सर्व पुस्तक तयार झाल्यावर ठरवूं वर लिहिल्या प्रमाणें या पुस्तकाचे सुमारें १० अंक होतील असा अजमास आहे.

हें पुस्तक ज्यास पाहिजे असेल त्यांणीं आपलें नांवें पोस्टपेड पत्रें पाठवावीं. किंमती बद्दल टिकिटा पाठविणें झाल्यास अर्धे आणा दराच्या बर्तानव्या स्टांप पाठवाव्या.

या ग्रंथाच्या प्रती किती काढाव्या हें वर्गणीदारांची संख्या समजल्या वांचून ठरवितां येत नाहीं. यास्तव वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं कृपा करून आह्मास पत्रद्वारां लौकर कळवावें ह्मणजे प्रतींचा अजमास कळेल. पहिल्या अंकाचा आगाऊ पैसा जमा करणें तो एप्रिल अखेर केला पाहिजे.

पहिला अंक मे महिन्यांत वर्गणीदारांकडे रवाना होईल व पुढें दर महिन्यास पाठविला जाईल.

या प्रतींचा खप बराच होऊन आह्मास उत्तेजन आल्यास संस्कृत टीकेसह व गद्य संहिता पुस्तक छापण्याचा विचार करूं.

रत्नागिरी जगन्मित्र हापिस

ता० २७ मार्च सन १८७३.

जनार्दन हरि आठल्ये

जगन्मित्राचे मालक.

## पत्रव्यवहार.

या सदरांतील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचाराचे एडिटर यांस.

विनंती विशेष माझा धंदा या जगांतील चमत्कार पहाण्याचा आहे. त्यांत इतर देशाविषयी त्या बद्दल वर्तमान पत्रांत वारंवार मजकूर हमेशा लिहित आलोंच. व हल्लीं मी वऱ्हाडप्रांतांत आलों आहे. पहिला मुक्काम उमरावती शहरांत केला याजकरितां याच शहरांतील हकीकत आपणास लिहितों ती आपण आपले पत्रीं छापल्यास मजवर तर काय पण अनेक जणावर उपकार केल्याचें श्रेय आपणास येईल व असें केल्यास पुन्हा ही वारंवार आपल्याकडे मजकुर छापण्यास पाठवित जाईन.

मी येथें आल्यावर सरकारी कचेऱ्या पहाव्या असें माझे मनांत आलें सबब प्रथम कलेक्टर ह्मणजे बगैरे डिपटी कमिशनाचे कचेरींत गेलों आणि पहातों तों जिकडे तिकडे कडी कोट बंदोबस्त. महून कमन सर्व दारांत वाळयाच्या सत्या लावलेल्या आहेत किती एक दरवाजे अजिबात बंद केलेले आहेत व एक दोन दरवाज्यास चिकाचे पडदे लावलेले दिसले व याशिवाय आणखीही कांहीं बंदोबस्त नजरेस आला. त्यावरून मला असें वाटलें कीं, ही कचेरी नसून कोणी श्रीमान मुसलमानाचा अगर रजपूत सरदाराचा जनानखाना असावा. व जमलेले लोक त्याचे चाकर असावे. परंतु जरा पुढें होऊन एका लाल पट्याचे शिपायास हें काय आहे ह्मणून विचारल्यावर ही जिल्हा कचेरी आहे असें त्याणें खात्री पूर्वक सांगितलें. व इतक्यांत एक केदी पलिसचे शिपाई घेऊन येतांना पाहिले. त्याजवरूनही माझी खात्री झाली. वाहवा! काय ही गोशातली कचेरी ! ! मी डिपुटी कमिशनरची कचेरी पहावी ह्मणून पुढें गेलों व व्हराड्यांत चढणार इतक्यांत एका शिपायानें मला मना केलें व एक जाहिरात भिंतीस चिकटवली होती. ती दाखविली. ती ती दुरून वाजली तींतील आशय येणेंप्रमाणें:—

या व्हराड्यांतून कोणी येऊं जावूं नये अगर कोणी येथे उभें राहूं नये व जो कोणी या हुकुमाविरुद्ध वागेल त्याजवर कोर्टाचा अपमान केल्याचा चार्ज ठेवून त्यास शिक्षा दिली जाईल.

या जाहिरातीवर सही मी. हार्डेंग डिपुटी कमिशनर यांनीं केलेली आहे.

एडिटर महाराज अशी नोटिस देण्याचा डिपटी कमिशनरास कोणतें कारण झालें? व त्यांत लिहिल्या प्रमाणें न वागतां कोणी त्या जागेंत न गेला असतां तेवढ्यानेंच कोर्टाचा अपमान होईल काय ? तिकडून जाऊं न देण्याचा उद्देश काय ? व असा उद्देश मनांत येण्याचें कारण काय ? या बद्दल आपल्याने तर कांहीं अनुमान करवत नाहीं परंतु असे दरवाजे लाऊन कचेरी करणें व अशा जाहिरनामा लावणें हें कायदेशीर आहे असें ह्मणण्यास कायद्यांत कोठें ही आधार सांपडत नाहीं ह्मणतात.

सरकारी कचेरी व मुख्यत्वें करून न्यायाची कोर्टें हीं अगदीं उघड आहेत. तीं बंद ठेऊन काम करण्याचा अधिकार प्राय: कोणास नाहीं. या जिल्हे कोर्टांत दिवाणी मोकदमे व आपले फौजदारी अपिलें यांची चौकशी व निकाल मामुली कोर्ट हाऊस मध्यें न होतां त्याचे मागे एक जागा आहे त्या कोठडींत होत असतो व वर लिहिल्या प्रमाणें सर्व दारें बंद असतात. आंत जावें तर एका बाजूनें वरांड्यांत न जाण्या विषयीं जाहिरनामा आहे व पुढें कोर्टांतून जावें तर तेथेंही एक असिस्टंट कमिशनर बसत असतात त्यामुळें तिजकडून जाण्याचीही पंचाईतच. तेव्हा ही मोगलाई कचेरी आहे कीं काय असा भास होतो.

इतर ठिकाणासारखें येथेंही मनीआर्डर आफिस आहे. परंतु हल्लीं पहिल्यापेक्षा वहिवाट अगदीं निराळीच आहे. मनीआर्डर पाहिजे ती कोणाचे नावें कोठें पाठविण्याची वगैरे मजकूर लिहून देण्या विषयीं सरक्युलर आहे त्यांत फक्त इंग्रजी नमुने असावे असें नसून एतद्देशीय भाषेंत ही नमुने छापलेले असावेत. ह्मणजे जे अनेक लोक मनीआर्डर घेण्यास येतात त्यास इंग्रजी येत नसल्यामुळें हरकत पडणार नाहीं. असे विषयीं सरक्युलरांत खास लिहिलेलें असून त्याप्रमाणें या उमरावती जिल्ह्यांत अम्मल होत नाहीं. इंग्रजी नमुने मात्र भरण्याकरितां देत असल्या कारणानें त्याजवर दुसऱ्याकडून लिहून घेण्याची लोकांस जरूरी पडते व कोणाचे ओळखीचा कोणी लिहिणारा नसल्यास कचेरींतील उमेदवाराजवळ लिहून मागितल्यास तो एक आण्यापासून च्यार आण्यापर्यंत लिखाई मागतो व ती देणें भाग पडते. बरें इतकेंच मळेल तर ते लिहून घेतल्यावर मनीआर्डर देणारे कारकुनाकडून खजिन्यांत व खजिन्यांतून पुन्हा मनीआर्डर देणाराकडे एकदोनदां जावें लागतें ह्मणजे इतक्या कृत्यास निदान एक प्रहर तरी गुजरून जातो तेव्हां कोठें मनीआर्डर हातीं येते. तर इकडे लक्ष पुरवून हुंडी घेण्यास येणारे लोकांस विनाकारण उशीर व त्रास न पोहोंचे अशी तजवीज होईल.

तर ध्या आपण सदरील मजकुराची दाद आणि करा आह्मास मदत. कारण लोकांचीं सुखदु:खें पुढें आणून त्याजबद्दल दाद मागण्याचें तुमचें कामच आहे तें करा. कळावें तारिख १४ माहे मे सन १८७३ इसवी.

चमत्कारावलोकनेच्छू.

वऱ्हाडसमाचार.

मिती वैशाख वद्य १४ शके १७९५

## बाहेर ऐकूं जाणारीं वाद्यें रात्रीं वाजवूं नका.

या महिन्याचे पहिले तारखेत आमचे अकोल्याचे आफिशिएटिंग डिपुटी कमिशनर कॅप्टन बुलक साहेब यांनीं एक जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे त्यातील मजकूर असा.

अकोलें कसब्यांत व पेठेंत रात्रौ १० वाजल्यापासून सकाळचे सहा वाजतों पर्यंत परवानगी वांचून कोणी वाद्य अगर वाजंत्री वाजऊं नये ह्मणजे आपले घरा बाहेर लोकास ऐकूं येणारीं जीं वाजंत्रें आहेत तीं वाजवूं नयेत. सदर्हू या हुकुमा प्रमाणें जो वागणार नाहीं त्याजवर कायद्या प्रमाणें तजवीज केली जाईल.

बदोबस्ता करितां व लोकांस त्रास न पोंचावा याकरितां असे प्रकारचे जाहिरनामे लावणें माजिस्त्रेटास अवश्य आहे परंतु त्यांत सारासार विचार पाहिला पाहिजे. कोणाचे कानांत वाजंत्राचा कस लाही ध्वनी रात्री जाऊं देऊं नये असा जाहिरनाम्याचा इरादा नसावा असें आह्मी कल्पितों आणि तसें नसेल तर लोकांस याचा पासून फार त्रास पोंचेल असें आह्मांस वाटतें. कोणाचे घरीं लग्नाची मिरवणूक आहे, कोणाचे दारापुढें गोंधळ अगर तमाशा होणार आहे, नाटकगृहांत नाटक चाललें आहे, कोठें नाच बैठक होत आहे तर अशा प्रसंगांत रात्रौ रस्त्यानें लोक फिरणार व एका ठिकाणीं समुदाय जमणार ह्मणून पोलिसास बंदोबस्त नित्यापेक्षां जास्ती ठेवतां यावा याकरितां अशा जाहिरनाम्यांनीं परवानगीची अट ठेवणें वाजवी आहे. तरी हीं सर्वच प्रकरणें लोकांच्या कानास त्रास देणारीं आहेत असें नाहीं. ताशे, मर्फे, डेंक, नौबद, कर्णे, शिंगें, बंदुकांचे आवाज इत्यादि रणवाद्यें हीं रात्री लोकांच्या सुखाचा व शांतीचा भंग करणारीं आहेत अतएव मनाकरणें अवश्य आहे तरी त्या विषयींही परवानगी मागणारास सरकाराच्यानें कांहीं नाहीं ह्मणवणार नाहीं; कारण हौस करितां, उत्साह करितां व अवश्यक कार्य ह्मणून आमचे लोकांत हे प्रकार होत असतात व ते लोक तशा प्रसंगीं परवानगी आणीत असतात ही वहिवाट पूर्वापार चालू आहे मग हा नवा जाहिरनामा कशा करितां झाला तें आह्माला समजत नाहीं. दुसरें नाटक, कथा, नाच, बैठक ही समुदायाचीं व रात्रौ लोक फिरण्याचीं कार्ये ह्मणून यांस परवानगी पाहिजे, व परवानगीवांचून तीं करूं नये असें जाहिरनामही पाहिजेत तर तरी ते प्रकार कर्णकटु किंवा लोकांस त्रासकारक आहेत असें नाहीं. कथा असली तर हातचें काम सोडून लोक कथेस जातात. ते कानाला त्रास व्हावा ह्मणून जातात काय? नाहीं. नाटकाला खिशांतले पैसे देऊन लोक जातात. ते कानाला त्रास व्हावा ह्मणून जातात काय? नाहीं. उत्तम गायन काठें चाललें असेल तर बाहेर उभे राहूनही लोक ऐकतात. ते कानाला त्रास व्हावा ह्मणून काय? नाहीं. तर या सर्व प्रकारांवरून व लोक वहिवाटी वरून असें दिसतें कीं याची परवानगी शिवाय जी मनाई ती पोलीसाच्या बंदोबस्ताच्या संबंधानें मात्र असावी. लोकांच्या ऐकूं जाण्याशीं या मनाईचा कांहीं संबंध नसावा.

बरें आतां तिसरी गोष्ट, " घरा बाहेर ऐकूं येणारीं वाजंत्रें वाजवूं नयेत" याची व्याप्ती कोठपर्यंत समजावी? आह्मी ह्मणतों कीं, याला कांहीं मर्यादा पाहिजे होती ह्मणजे मना केलेल्या वाजंत्राची याद या जाहिरनाम्याला जोडली पाहिजे होती. नाहींपेक्षां बहुत निर्दोष कृत्येंही गुन्हा ह्मणून लोकांस शिक्षा दिल्या जातील. हरदास व इतर भजनी लोक नित्य पंचपदी करितात त्यांत मृदंग, टाळ, झांज ढोलघटका वगैरे वाद्य असतात व तीं दुसऱ्यास ऐकूं जाणारीं असतात तेव्हां त्यांनीं नित्य परवानगी घ्यावी कीं काय? नवरात्रांत, गणपतीचे दिवसांत रात्रौ आरत्यांचे समारंभ होतात त्यांत टाळ, झांज, घंटा वगैरे वाद्यें वाजविलीं जातात व तीं लोकांस ऐकूं जातात तेव्हां त्यांस परवानगी लागेल काय? आरतीचा घंटा लोकांना ऐकूं जाईल ह्मणून जर परवानगी पाहिजे तर रात्रौ गाडींत बसून जाणाराच्या बैलाच्या गळ्यांत पांचपन्नास घंटा असल्या तर त्यानें वाजंत्रीं वाजविलीं ह्मणून त्यास पक डतील काय? तो तर शपथ वाहून सांगेल कीं, मी वाजंत्राला हातसुद्धां लाविला नाहीं. कोणी गच्चीवर बसून सुस्वर अलगुजें वाजविलें, कोणी मोरचंग वाजविला अथवा एकाद्यानें सतार वाजविली आणि तिच्या योगानें भोवतालचे लोकही खुश होऊन ऐकत बसले तर त्यांचे कानाला ऐकूं जाऊं दिलें ह्मणून गुन्हा समजून त्यास पकडावें व शिक्षा द्यावी काय? व पाहून त्रासकारक भटांचे मंत्र जागर व मुसलमानांचे निमाजाची बांग पुकारणी ही होत. हीं चालली असतां आसपास दहा पांच घरचे लोकांस झोंप येत नाहीं, पण ते लोक सदरील जाहिरनाम्याप्रमाणें गुन्हेगार नाहींत. का तर त्यांनीं वाद्य वगैरे केलीं नाहीं. एक वाईट दृष्टांत घेऊं फाल्गुनांतील ध्वनीला अर्जुन वाद्य ह्मणतात पण वास्तविक पाहतां त्यांत वाजंत्र नाहीं तेव्हां गुन्हा आहे किंवा नाहीं? असतु हा विषय फार लांबला सबब आह्मी आतां आटपतों व डिपुटी कमिशनर साहेबास इतकेंच विनवितों कीं हा जाहिरनामा लोकांस कांहीं अंशीं त्रासकारक आहे सबब तो रद्द करावा किंवा लोकांच्या सलसोईनुरूप त्याची व्याख्या करावी ह्मणजे बरें होईल.

## वऱ्हाड

वऱ्हाडांत पूर्व भागचे व पश्चिम भागचे असे दोन कमिशनर आहेत ते त्यांचे तसे अधिकार कमी करून दिवाणी फौजदारी कामा करितां साही जिल्ह्याला एक जुडिशियल कमिशनर व दुसऱ्या साही जिल्ह्याला एक रिव्हिन्यु कमिशनर करावा असा सरकाराचा विचार बहुत दिवस चालू आहे तो आतां लवकरच अमलांत येणार असें कळतें.

—०००—

या आठवड्यांत उन्हाळा फार कडक होत आहे. नदीचें पाणी आटत चाललें आहे. युरोपियन लोकांच्या बाजूस धरण आहे त्यांतील पाणी त्यांस पोहण्यास उपयोगी पडतें व खालचें हाणजे गावाकडील बाजूला नरोटी लागली आहे त्यांतील नेटिवलोकांनां पिण्याला हो चांगलें मिष्ट पाणी मिळत नाहीं. पाण्याचें हवें खांचलें आहे तेथें कोणी थुंकूं नये, व इतर प्रकारची घाण करूं नये असा कडेकोट बंदोबस्त पोलिसानें करून आहे. पण त्याच जागीं साहेब लोकांस मासे धरण्याकरितां जाळीं घालण्यास व पाणी गढूळ करण्यास यथेच्छ परवानगी आहे असें दिसून येते. अरेरे! दास्यता व दुर्बलता किती! नीच आहे ईश्वरानें गरिबांवर कृपा करून दिलेलें पावसाचें पाण्याचाही मनाप्रमाणें गरिबांस उपयोग करावयास मिळत नाहींना ?

—०००—

अकोल्याच्या हायस्कुलांतील विद्यार्थी यांनीं या सुटींत सवाई माधवरावाचें नाटक लोकांस करून दाखविण्या करितां तयारी केली आहे. व मि० कंडी साहेब डायरेक्टर यांनीं त्यांस चांगलें अनुमोदन दिलें आहे. जून महिन्याचे पहिले किंवा दुसरे आठवड्यांत त्याचा खेळ होईल. या खेपची त्यांची तयारी मागील पेक्षां विशेष दिसत आहे.

—०००—

काल रोजीं महाराणी साहेबांच्या जन्म दिवसा करितां सुटी होती व २२ वे तारखेस युरोपियन लोकांचा व्हाइटसनडे ह्मणून सण होता या दोन्ही संबंधानें अर्धा आठवडा सरकारी आफिसें बंद होतीं.

—०००—

एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर मि० दिनमाजी मरण पावल्यापासून त्यांची जागा आज कित्येक महिने रिकामी होती व तिजविषयीं पुष्कळांचे पुष्कळ तर्क होत पण शेवटीं रेसिडेंटसाहेबांनीं आपले जुडिशियल शिरस्तेदार रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण भट यांची शिफारस केली व हिंदुस्थान सरकारानें ती मान्य करून त्यांची त्या जागेवर नेमणूक केली. पुरुषोत्तमराव नारायण भट हे हुशार आहेत व त्यांस इकडे बढती मिळाली हें चांगलें झालें. आतां ते लवकरच येऊन आपले कामाचा चार्ज घेतील.

वऱ्हाडांतल्या वऱ्हाडांत ही जागा लागली हक्कदारांस मिळून त्यांत इकडील च एकादे क्लार्क आफ धि कोर्ट, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर झाले असते तर खालीं कित्येक लोकांस प्रमोशन मिळालें असतें व तसें घडणें योग्यही होतें पण त्याविषयीं आतां बोलून उपयोग नाहीं; तथापि अजूनही आम्ही इच्छितों कीं, हैदराबादेस पुरुषोत्तमरावाचे जागेवर तरी आमचे इकडील क्लार्क आफ धि कोर्ट यांस नेमण्याची रेसिडेंट साहेबांनीं मेहेरबानी करावी. व त्यास आणि आल्या ला दर्जेवाल्यांस खुशी करावी. असें न्यायाशिवाय त्यांस दुसरी उमेद कोण

—०००—

मि० परशराम सखाराम गुप्ते उ वर्तीचे क्लार्क आफ धि कोर्ट यांच्या कर्णाचे चौकशी उद्या २६ वे तारखेस पुन्हां सुरू होणार असें समजलें आहे.

—०००—

आलीकडे सरकारानें असा एक ठराव केला असल्याचें वाचकांस ठाऊक असेल कीं, राजघराण्यांतील व इतर खानदानी घराण्यांतील कांहीं हुशार उत्सुक असलेल्या तरुण गृहस्थांस सरकारी कामांत शिरावयास हुरूप यावा याकरितां प्रथम २०० रुपये पगार त्यांस ... साठीं द्यावा व पुढें त्यांस जसजशी ... ती होईल तसतसा यांचा पगार व ... वाढवावा. व त्याप्रमाणें बंगाल्याकडे ... टरिचे राजे यांस हिंदुस्थान सरकारानें नेमिलें आहे. तसें वऱ्हाडांतही ... नेमावें अशी रेसिडेंटसाहेबांनीं शिफारस केल्यावरून कर्नाटकच्या नवाबसाहेबाचे घराण्यांतील खानबहादूर शाबुदीन ... यांस वऱ्हाडांत २०० रुपये दरमहा ... काम शिकण्याकरितां नेमिलें. ... आतां लवकरच इकडे येतील.

आतां अशा नेमणुकांचा हा नवीन प्रचार पडत आहे तेव्हां त्या लोकांचे सुखदुःखास कशा काय कारणीभूत होतात तें पहावें.

—०००—

टेंटेज अलोवन्स ह्मणजे तंबूभत्ता याजविषयीं हल्लीं नवीन ठराव असा झाला आहे कीं कोणी आफिसर १४ दिवसांहून अधिक दिवस एक गावीं राहील तर त्यास तंबुभत्ता मिळणार नाहीं तसा दुसरा एक ठराव झाला आहे कीं ... रीचे कामा करितां कोणी आफिसर ... त्यांत ७ दिवस सदर स्टेशनांत येईल तर त्यास या दिवसांचा तंबू भत्ता मिळण्यास हरकत नाहीं.

—०००—

रेसिडेंट साहेबांस हिंदुस्थान सरकारा कडून असा एक हुकूम झाला आहे कीं ... परवानगीनें किंवा माहितीनें कोणी ने... गृहस्थ विलायतेस जातील व त्यांचे ... इंडिया आफिसाशीं कांहीं काम असेल ... त्या गृहस्था विषयींची सर्व माहिती रेसिडेंट साहेबांनीं विलायतेंतील इंडिया आफिसाचे पोलिटिकल सेक्रेटरी यांजकडे पाठवित जावी.

—०००—

इचलकरंजीकर नाटकवाले उमरावतीस बरेच रमले आहेत. कांहीं शनवारास त्यांस दर खेळास तीनशाहूनही अधिक रुपये मिळाले. ते वरसात लागू होई पर्यंत तेथें राहणार व मग इचलकरंजीकडे परत जाणार असें वर्तमान आहे. खामगावास व अकोल्यास सुमार दोन दोन हजार रुपये त्यांनीं मिळविले ... उमरावतीस तीन सहस्राचा त्यांचा संकल्प दिसतो. नाटकवाल्यांना या वऱ्हाडांत महिना दाईं हजार रुपयांची प्राप्ती झाली ह्मणजे हा त्यांना सामान्य योग नव्हे !

पंजाब पोलिसांपैकी मि० टो. मिथ यांची नेमणूक टपालखात्यातील ... बाहेर काढण्याकरितां हिंदुस्थान सरकारा[ने] केली आहे त्या बाबदींत वऱ्हाडांतही [जे] तपास करूं लागतील तेव्हां त्यांस [को]णाही जिल्ह्यांत पोलिस सुपरिंटेंडेंटचा अ[धि]कार आहे असें समजावें ह्मणून ठराव झाला आहे.

—ooo—

सेकंड आसिस्टंट असिस्टंट शेख रहीमबक्ष यांस अकोल्यास व शेख हासमत अली यांस उमरावतीस सिविल सर्जन [यां]चे हाताखालीं नेमिलें आहे.

—ooo—

ले० गनत्राप पोलिसाकडील असिस्टंट सुपरिंटेंडेंट. हे जानेवारीचे ४ थे तारखे पासून क्यापटन झाले.

—ooo—

मि० गेफट पोलिस सुपरिंटेंडेंट हे [हि]क्काचे रजेवर गेले त्यांचे जागीं मि० हीथ यांस नेमिलें.

—ooo—

अकोल्याचे वकील मि० देवराव वि[ना]यक यांनीं येथील सेशनकोर्टा पुढें दोन मुकदम्यांत पासिक्युटराचें काम फार चांगलें रीतीनें केलें ह्मणून त्यांस एक सर्टिफिकिट व १००रुपये बक्षिस दिले. देवरावसारख्या हुशार वकीलास १०० रुपये ह्मणजे वर्णनीय ह्मणण्या सारखी देणगी नव्हे परंतु अधिकाऱ्यांनीं त्यांची हुशारी मनांत आणून त्यांस तें काम सांगितलें व सरकारचा मानाचा विडा याप्रमाणें भूषणार्थ ती देणगी दिली. ही गोष्ट मनांत आणिली असतां देवरावं यांस पुष्कळ गौरव व उत्तेजन मिळालें असें त्यांनीं समजावें.

—ooo—

इलिचपुर ता० २० माहे मे सन १८७३.

हवा फार खराब झाली आहे. आकाश नेहमीं अभ्रानीं आच्छादित असतें. एखादे वेळीं पावसाचे थेंब पडतात. रोगराई फारशी नाहीं गरमी फार होते. जिल्ह्याचे युरोपियन सरदारां पैकीं असिस्टंट कमिशनर तामसन साहेब मात्र एथें आहेत व नवीन नेमिलेले पोलीस सुपरिंटेंडेंट साहेब अंजनगावाकडे रहावयास झाली आहे तिकडे तपासास गेले आहेत थोड्या दिवसां पूर्वीं वडनेर गंगाई एथें वीज पडून तीन मनुष्यें मयत झालीं अशी खबर होती. असें कळतें कीं हीं मनुष्यें विजेनें मेलीं नसून कोणी द्रव्यलोभास्तव मारलीं. पोलीस चवकशी करितें आहे.

एथें एक नवीन गांवठी शाळा झाली आहे ती नवाचे कुटींत घातली आहे शाळा घालणार आपंच एथील स्मालकाज कोर्टाचे क्लार्क रावसाहेब गोपाळ महादेव भिडे यांचे तिर्थरूप आहेत. शाळेत मुलें काल सातआठ होतीं पुढें दहा पर्यंत जमतील व पंतोजी बाबास च्यार एक रुपये दरमहा पडेल असें लोक बोलतात. घरचे गरीबी मुळें हा नवीन उद्योग तात्या पंतोजीनीं काढला नसावा परंतु वृद्धापकाळीं कांहीं तरी परोपकाराचे काम घडावे असा उद्देश असावा. यांचे पुतणे यवतमाळ येथील ब[ा]नर्क शाळेले [मु]ख्यनायकरावे भिडे हल्लीं एथेंच आहेत.

नागडोह एथें मोठा तलाव बांधून तेथून पाणी शेतीच्या कामा करितां दूरदूर न्यावें असा आमचे एथील डेपुटि कमिशनर साहेबांचा इरादा आहे व त्यांचें ह्मणणें सरकारानें कबूल केलें आहे असें समजतें. रंगोस्वामी नावाचे ओव्हरसियर याच कामा करितां एथें आले आहेत असेंही समजतें.

—ooo—

सिंहस्थ असून उद्यां सोमवती अमावास्या ह्मणून दोन तीन दिवस नाशिकास जाणारांची फार गर्दी आहे. डबे ! पुष्कळ जोडित असतात तरी बसावयास जागा मिळत नाहीं. इतकी दाटी असते.

—ooo—

इलिचपुरचे रिविन्यु शिरस्तेदार रा. रा. परशराम जगन्नाथ यांस यवतमाळास नेमिल्याप्रमाणें ते १९ वे तारखेस तिकडे जाण्याकरितां निघून गेले. परंतु त्यांचे जागेवर रा. रा. परशराम गणेश यवतमाळचे रिविन्यु शिरस्तेदार यांची नेमणूक झाल्याप्रमाणें त्यांस इलिचपूरचे डिपुटि कमिशनर कामावर रुजू करीत नाहींत असें समजतें. मग पुढें काय होतें पहावें.

—ooo—

मुंबई सरकाराचे ग्याझेटावरून समजतें कीं, मि० एफ. इलियट मुंबई सिविल सर्विसपैकीं यांस वऱ्हाडांत जागा देण्या करितां हिंदुस्थान सरकारच दिमतीस दिले.

—ooo—

अकोल्यास दिल्लीहून इंद्रजालचा तमाशा करणारे लोक आले आहेत. त्यांनीं काल तिसरे प्रहरीं गुजावरायाचे चौकांत आपला पहिला खेळ केला. खेळांत ज्या ज्या कृति करून दाखविल्या त्याविषयीं खालीं लिहिल्याप्रमाणें जाहिरात त्यांनीं प्रसिद्ध केली होती:—

१. एकानें बंदुकीची गोळी मारावी व दुसऱ्या मनुष्यानें आपले दातानीं पकडावी.

२. एका मनुष्याला गोळी लागून त्याच्या अंगातून पुष्कळ रक्त निघावें व तो मरावा आणि मागाहून जिवंत व्हावा.

३. कार्ड किंवा गंजीफांतील एक पान काडून तोडून बंदुकींत भरावें व बंदूक उडवावी आणि पुन्हां ती कार्ड किंवा गंजीफा जशीची तशी शाबूत बाहेर काढून द्यावी.

४. सवा मणाचा बोजा डोळ्याचे पापणीनें उचलावा.

५. दोन च्यार मनुष्यांचे हातरुमाल घेऊन फाडावे व जाळावे आणि पुन्हां जसेंचे तसे शाबूद आणून द्यावे.

६. एक रुमाल पेटींत बंद करून ठेवावा व तो दुसरे कोणाचेंही खिशांतून, पागोट्यांतून काढून द्यावा.

७. एका मनुष्याचे हातांत काळा व एका मनुष्याच्या हातांत पांढरा रुमाल असावा व ते दूर दूर उभे असावेत तरी एकाचा रुमाल दुसऱ्याच्या हातांत आणून द्यावा.

८. एका ग्लासांत दूध व एका ग्लासांत पाणी वेगवेगळें ठेवलें असतां तें एकत्र करावें व पुन्हां वेग वेगळें करावें.

९. एकाच्या पोटांतून तोफ, पिस्तुल दोन तोन शेर वजनाचे गोळे, चाकू कातरीवगैरे काढून आंचा ढोंग करून दाखवून द्यावा.

१०. एका मनुष्याला दूध पाजावें व त्याचे हाताची शीर खोलावी तींतून दूध बाहेर पाडावें.

असे बहुत प्रकारचे चमत्कार त्यांनीं दाखविले येत्या गुरुवारीं सायंकाळीं सहा वाजल्या पासून रात्रौ ९ वाजेपर्यंत अशाच प्रकारचे दुसरे चमत्कार ते दाखविणार आहेत.

मागाहून आलेली नोटिस.

नोटिस—ठाकुरहरीलाल वल्लद शंभुराम आगरवाले तेलार कर यांस खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुम्हीं आम्हांस वऱ्हाडसमाचार अंक वीस पांत नोटिस दिली परंतु तुम्हीं आम्हांस नोटिस देण्याचे कारण नसून नोटिस दिली हें गैर केलें तुमचा आमचा संबंध या बाबतींत निष्कूल नाहीं कळावें तारीख २१ माहे मे सन १८७३ इ०

[सही] अमेदीराम नथ.नी मारवाडी

दस्तुर खुद.

## वर्तमानसार.

महाबळेश्वरास पुष्कळ पाऊस पडला.

भंडारा जिल्ह्यांत एका गांवीं चोरटे लोक जाऊन २९००० रुपये त्यांचीं लुटून नेले.

कलकत्याच्या जाष्टिस आफिस पीसचे व्हाइस चेरमन बाबु उमेशचंद्र यांस बहुमतानें निवडलें,

चमत्कारिक फिर्याद—अमदाबाद समाचार पत्राचे मालकानें रेलवे कंपनीवर अशी फिर्याद केली आहे कीं, गाडीमध्यें एक महार आमचे शेजारीं बसविला होता त्यामुळे आह्मांस विटाळ होऊन कपडे धुवावे लागले व खराबी झाली त्याबद्दल पांच रुपये नुकसानी देववावी! ही फिर्याद चमत्कारिक दिसते. गाड्यामध्यें जातिभेद राखू व कोणाचे सोवळें विटाळूं देणार नाहीं अशी, रेलवे कंपनीची कबुलायत आहे कीं काय?

श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांची प्रकृती आतां दुरुस्त होत चालली आहे व त्यांचें कुटुंब सहा महिन्याचे गरोदर आहे त्यांनीं दुखणें अधिक वाढलें तेव्हां मृत्युपत्रही करून ठेविलें होतें असें ह्मणतात.

मुंबई हायकोर्टांतील वकील मि० नानाभाई हरीदास यांस सरकारानें हायकोर्टाचे जज्ज नेमण्याचा ठराव केला आहे हें ऐकून आम्हांस फार संतोष वाटतो या गृहस्थांस आतां पावणेच्यार हजार रुपये दरमहा पगार मिळेल. हे गृहस्थ तिसावे तारखेस आपले कामाचा चार्ज घेणार असें एका पत्रांत लिहिलें आहे.

जहांगिर शेट या नावाचे एक पारशी गृहस्थ ४६ वर्षें चीन देशांत व्यापार करित होते ते गेल्या आठवड्यांत मुंबईस आले आहेत.

सूत काढण्याचें व कापड विणण्याचे कित्येक नवे कारखाने मुंबईस सुरू होणार आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

कोल्हापुर इलाख्याचें क्षेत्रफळ २९९३ चौरसमैल आहे. गाव आणि खेडीं मिळून १०८६ आहेत खानेसुमारी ८०२९६१ आहे. व कोल्हापुर शहरांत लोकवस्ती ३९६२१ आहे.

त्रिचनापल्ली एथें २६ तारखेस खून करणारे पंच असामींस एकदम फाशीं दिले

खोट्या नोटी करणारा मद्रास इलाख्यांतील व्यंकट चिलम यास पकडण्याचे कामांत ज्या पोलिसांतील लोकांनीं चांगली मेहेनत केली त्यांना हिंदुस्थान सरकारानें मोठमोठालीं बक्षिसें दिलीं. मि० वेलडन यांस ५००० रुपये, रामचंद्रराव डिपुटी कमिशनर यांस २००० रुपये, राजा गोपाळ चीफ कानस्टेबल यांस १००० रुपये केशवरावस्वामी इन्स्पेक्टर यांस १००० रुपये व याचप्रमाणें दुसऱ्या कित्येकांस बक्षिसें दिलीं.

मि० अनेस्टी साहेब बारिस्टर विलायतेस गेले होते ते मुंबईस परत आले.

मुंबई इलाख्यात रजिस्टर खात्याकडे ४ इन्स्पेक्टर नेमिले. त्यांस प्रत्येकीं १५० रुपये पगार व १०० रुपये भत्ता मिळेल.

ग्वालेरचे शिंदे सरकार सिमल्यास गेले आहेत. वीस दिवस तेथें राहण्याचा त्यांचा विचार आहे.

पुण्याचे रावबहादुर सदाशिव बल्लाळ गोडे यांस सब असिस्टंट इनाम कमिशनर असा हुद्दा होता तो बदलून असिस्टंट सेटलमेंट आफिसर असा नवा हुद्दा दिला.

कानपुराकडे महामारी सुरू झाली आहे

उदेपुरास धातूच्या खाणीच्या कामाकडे प्राफेसर बुशल यांस नेमिलें आहे.

विलायतेस सिविल सरव्हीसच्या परिक्षे करितां गेलेले दोन पारशी गृहस्थ नापास झाले. हें ऐकून आह्मांस वाईट वाटतें.

पुणें दरबार—ता० २४ मे रोजी महाराणी क्वीन विक्टोरियाच्या वाढ दिवसाच्या उत्साहा बद्दल एजंट साहेब, दरबार कौन्सिल हालमध्यें करणार आहेत; कारण एजंट आफिसांत जागा बरोबर नाहीं सबब कौन्सिलच्या बंगल्यांत बेत केला आहे. या दरबारांत पेशवाई साला[बा]द प्रमाणें ज्या बड्ये लोकांस देतात त्यांस दिले जाणार आहेत. तेव्हां रावबहादुर सदाशिवराव गोडे यांस सरकारानें राव बहादुरचा किताब नवीन दिला त्याविषयीं त्यास सरकारांतून गणि नेळाबेळा त्यांचे आभार मानेल आहेत. त्याबद्दल एजंट लॉर्ड सर्वांस कळण्याकरिता थोडेसें संभाषण करणार आहेत.

ज्ञा. प्र.

पुणें वक्तृत्वोत्तेजक मंडळी—चालू सालचे वक्तृत्वोत्तेजक मंडळीचे भाषण समारंभास गेले सोमवारीं आरंभ होऊन शुक्रवारीं समाप्ती झाली. ह्या सालीं एकंदर बक्षिसांकरितां भाषण करणार उमेदवार चोवीस होते. त्यांत हिंदुस्थानचे संपत्तीविषयीं भाषण करणाऱ्या उमेदवारांचीं नावें नऊ व विठोजी होळकर यांचे मरणाविषयीं भाषण करणाऱ्या उमेदवारांचीं पंधरा नावें होतीं. त्यांत हिंदुस्थानचे संपत्तीविषयीं भाषण करणाऱ्या उमेदवारांपैकीं पाचच असामींनीं मात्र भाषण केलें. बाकीचे लोक मुळींच पुढें आले नाहींत. तसेंच विठोजी होळकराचे मरणाविषयीं भाषण करणारांपैकीं चारा असामींनीं मात्र भाषण केलें.

हिंदुस्थानचे संपत्तीविषयीं भाषण करणाऱ्यांपैकीं गणेश जनार्दन आगाशे ह्यांचें नांव पहिलें आलें. दुसरें वासुदेव लक्ष्मण आठवले आणि तिसरें रामचंद्र कृष्ण नातू. विठोजी होळकर ह्यास बाजीराव पेशवे ह्यांनीं हत्तीचे पायांशीं बांधून मारलें. तेव्हां पुण्यावर स्वारी करण्याकरितां मल्हारराव होळकर समजून ज्या लोकांनीं भाषणें केलीं त्यांपैकीं विष्णु नारायण साठे ह्यांचें नांव पहिलें आलें. दुसरे चिंतामण नारायण केळकर व तिसरे गोविंदरावजी चितळे, चवथे भिकाजी भास्कर नस्कर, पांचवे काशिनाथ विश्वनाथ गोखले, सहावे काशिनाथ भैरव लिमये. हे सर्व उमेदवार बक्षीस मिळण्यास लायक होते. बाकीचे भाषण करणार लोकांस बक्षीस देण्यासारख्या मार्ग मिळाल्या नाहींत म्हणून त्यांचीं नावें येथें लिहिलीं नाहींत.

हिंदुस्थानाची संपत्ती हा विषय फार कठीण होता ह्यामुळें त्यावर भाषण करणार उमेदवारही थोडे होते. व ह्या विषयावर चांगलें भाषण करणारास बक्षिसेंही कमिटीनें अधिक ठेविलीं होतीं. पहिलें बक्षीस ५० रुपयांचें व दुसरें ३५ रुपयांचें. विठोजी होळकराचे मरणाचे संबंधानें भाषण फारसें कठीण नव्हतें, म्हणून त्यांत बक्षिसें ही कमी होतीं. पहिलें बक्षीस ४० रुपयांचें व दुसरें २५ रुपयांचें. ह्याप्रमाणें बक्षिसें नेमिलीं होतीं. हिंदुस्थानची संपत्ती ह्या विषयांत पहिलें बक्षीस गणेश जनार्दन आगाशे व दुसरें बक्षीस वासुदेव लक्ष्मण आठवले ह्यांस मिळालें. दुसरे विषयांत पहिलें बक्षीस विष्णू नारायण साठे व दुसरें चिंतामण नारायण केळकर ह्यांस मिळालें.

मुंबईचे कावसजी जापुजी मेथा नांवाचे प्रसिद्ध व्यापारी व्हायना एथील प्रदर्शन पाहण्यास जाणार.

रावसाहेब व खानसाहेब—जे मामलेदार हिंदू असतील त्यांस रावसाहेब, व पारशी आणि मुसलमान असतील त्यांस खानसाहेब असें किताब द्यावेत म्हणून सरकारानें सर्क्युलर केलें आहे. असें सर्क्युलर लौकरच झालें असल्यास टक्याशेर रावसाहेब व खानसाहेब होतील. ने. ओ.

श्री नारायण गिरि स्वामी नांवाचा ब्रह्म धर्मी गृहस्थ हिमालया पर्वताकडील तिबेट देशांत प्रवास करावयास गेला होता. त्याच्या प्रवासाची हकीकत बंगाल्यांतील तत्त्व बोधिनी पत्रिका नामक वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत आहे त्यांत तिबेटांतील ल्हासा नामक शहराचें वर्णन दिलें आहे त्यांत असें लिहिलें आहे कीं, हें शहर बुद्ध धर्माचें मुख्य स्थान आहे. या शहरीं लामा नामक बुद्ध धर्माचे आचार्य असतात. मुख्य लामास लोक ईश्वर समजून प्रत्यक्ष बुद्ध समजतात. लामा ब्रह्मचारी असतो. तिबेटांतील बहुतेक लोक बुद्ध धर्मी असून ते याच शहरीं यात्रे करितां येतात. मुख्य लामाच्या दर्शनास गेले म्हणजे लोक त्यास दुरूनच साष्टांग नमन करितात. लामा मरणाच्या वेळेस मूल जन्मलें असतां आपला जुना देह सोडून बुद्धानें मुलाच्या नव्या देहांत प्रवेश केला असें समजून त्या मुलास पुढें लामा करितात. या देशांत बहुत करून प्रेतें जाळीत नाहींत अथवा पुरीत नाहींत. प्रेतें डोंगरावर नेऊन टाकतात व तेथें तीं पशु पक्षी खातात काहीं लोकांत लग्नाची चमत्कारिक चाल आहे ती अशी कीं, वडील भावानें लग्न केलें म्हणजे दुसऱ्या भावास लग्न करावें लागत नाहीं. लोक बहुतकरून कच्चें व वाळलेलें मांस खातात. तिबेटांतील भाषेंत किंचित् संस्कृताचें मिश्रण आहे. परंतु ती फारशी भाषेप्रमाणें उजवीकडून डावीकडे लिहित जातात. हिंदुस्थानांतील वशिष्ठ व व्यास यांची त्या देशांत मोठी मान्यता असून त्यांच्या मूर्ती प्रत्येक देवळांत असतात. शु सु.

## व्याजा विषयीं नियम.

ज्या नियमांवरून कोर्टांनीं व्याज देवविण्याचा ठराव करावा ते नियम जुडिशियल कामगारांकरितां खालीं लिहिलेल्या सूचनांवरून व्यक्त होतात. पंजाबचे चीफ कोर्टानें ह्या बाबतींत केलेले सरक्युलर हे ड्रायदचे रेसिडन्सी आर्डर्स यांतील पान १२८ वर छापिलें आहे व त्यांतून सदरील सूचना घेऊन सारांश रूपानें मेहेरबान रेसिडेंट साहेबांचे मंजुरीनें पश्चिम वऱ्हाडांतील कामगारांचे माहितीकरितां प्रसिद्ध केल्या आहेत.

१. वऱ्हाडांत शेतकरी लोकांवर वाण्यांनीं केलेले फिर्यादींत शेतकऱ्यांवर कर्जाचा ठराव करितांना व्याज अतिशय मोठे दरानें देवविण्याचा हुकूम कांहीं कोर्टें करितात अशी शंका उत्पन्न झाली आहे.

२. ज्या मूळतत्त्वावरून राजी खुशीनें होणाऱ्या कोणत्या कबूलायती कायद्यानें अमलांत आणणार करार होतात तीं मूळतत्त्वें. हिंदुस्थानांतील करारांचे सन १८७२ चे ९ वे आक्टांत दिलीं आहेत. आणि कांहीं एखाद्यावर दुसरे कोणी एकानें विश्वास ठेविला आहे किंवा त्या दुसऱ्या मनुष्यावर अधिकार चालवीत आहे मग तो अधिकार खरा असो किंवा दर्शनी असो आणि तो त्या दुसऱ्या मनुष्याकडून आपला फायदा करून घेण्यासाठीं त्या विश्वासाचा अथवा अधिकाराचा उपयोग करितो कीं, जो फायदा तशा विश्वासाखेरीज किंवा अधिकाराखेरीज त्याला झाला नसता असें जेव्हां असेल तेव्हां सर्वत्र लागू व नीतीमान नियम कलम १६ आणि १७ यांत सांगितले आहेत. आणि जेथें खऱ्या गोष्टी लपविल्या गेल्या आहेत किंवा फसविण्यास योग्य अशीं कृत्यें झालीं आहेत किंवा एखादे करार करणारे मनुष्याचे राजीखुशीस व्यत्यय आणणाऱ्या गोष्टी स्पष्ट करून सांगणें असें कायद्यानें ज्या दुसऱ्याचें कर्तव्य आहे त्या कर्तव्यकर्मास बाध आणण्याजोगे रीतीनें कांहीं कृत्यें त्या दुसऱ्यानें करणें किंवा न करणें असें जें होईल तेथें काय परिणाम होतो हे त्या कायद्यानें दर्शविलें आहे.

३. सन १८५५ चे आक्ट २८ चें व्याजाचे कायदे रद्द केले आहेत परंतु कर्ज कित्येक खऱ्या कारणामुळें आपले स्वतः चे रक्षण करण्यास पूर्णपणें शक्तिमान नसणाऱ्या ऋणकोंचे नाहींत त्यांचें रक्षण करण्याविषयीं व अशा मनुष्यांशीं सदसद्विचारशक्तीचे विरुद्ध होणारे सव्द्यापासून त्या लोकांची सुटका करण्याकरितां कोर्टांचे शक्तीविषयीं जे नीतीचे नियम आहेत त्यांजला सदरी आक्टानें रद्द करीत नाहीं.

४. जेव्हां एखादा मनुष्य दुसऱ्याशीं करार करितो तेव्हां निःसंशय प्रथम दर्शनी असें मानण्याचा हक्क आहे कीं तो दुसरा आपले नफा नुकसानीकडे पहाण्यास समर्थ आहे. परंतु साम्यतानें अशक्तता कोठें थांबत अथवा अतिशय अज्ञानपण, आणि निरुपाय ह्यामुळें कायद्यांत सांगितलेले नीतीचे नियमानें रक्षण करणें केव्हां अवश्य होतें. ह्याबद्दल पक्का नियम नाहीं व पक्का नियम करितां येत नाहीं

५. तसेच निःसंशय हा साधारण नियम आहे कीं, ऋणकोस आपले धनकोकडे जाऊन त्याची आदाई केली पाहिजे अथवा त्याकडे पैसा पाठवून आदाई केली पाहिजे तथापि अमुक पेरणी करितां धान्य उसनवार घ्यावें करारांत (कीं जे करार विचारपूर्वक हंगामा नंतर धान्य मोठे दरानें व्याजानें वापस करण्याचे असोत) जर हंगामा नंतर शेतकऱ्याकडून आदाई नाहीं झाली तर तारतम्य पहाणें जरूर आहे. फक्त अमुक काळ पर्यंत व्याजाचा दर चुकावा म्हणून करार असला म्हणजे करारांचे वेळेपासून अमर्यादित काळ पर्यंत तो दर चुकावा असा करार करणार दोन्ही पक्षकारांचा प्रथमतः हेतु नसतो ह्यास्तव अशा प्रसंगीं शेतकऱ्याची स्थिती लक्षांत आणून पक्षकारांचे फेडीचा विचार केला पाहिजे.

६. पुष्कळ प्रकरणांत अयोग्य लाभाचे अतिरेकाचा तर्क (व्यवहार शास्त्र, नीतीचें साधारण नियम वरून) मालक ऋणाचा अतिशय अविचारीपणा त्यांत मिश्र होणाऱ्या दुसऱ्या गोष्टी वरून करितां येतो आणि ह्या देशांत सावकारीचा धंदा करणार लोक आणि ऋणको शेतकरी ह्यांचें आपसांतील संबंध असे प्रकारचे आहेत कीं, त्याचे कोर्टांनीं हा नियम लक्षांत ठेविलाच पाहिजे.

७. शेताचा मालक किंवा खेडूं किंवा तशा स्थितींत असणारा दुसरा मनुष्य याजवर सावकारानें केलेले फिर्यादींत (जेथें व्याज घेण्याचे हक्काचा तंटा आहे) कोर्टानें अतिमोठ्या दरानें व्याज कधीं हुकूमनाम्यानें देवऊं नये परंतु चौकशी करणार कोर्टाची खात्री झाली असेल कीं ज्या करारावरून ही फिर्याद करितो तो करार ऋणकोनें आपल्या स्थितींसंबंधी सर्व गोष्टींचा विचार करून व धनकोसंबंधानें आपली जबाबदारी काय आहे हें लक्षांत आणून राजी खुशीनें व कोणत्या प्रकारची अयोग्य जबरदस्ती न होतां केला आहे. तर मात्र त्या कराराप्रमाणें वर्तावें. झालेले करार विचार युक्त आहे किंवा नाहींत ह्याचा विचार कोर्टानें करावा. कारण अविचाराचा अमलांत तो रद्द करण्याचा हेतु लक्षांत धरून तसा विचार करूं नये कारण तसें करणें हें कोर्टाचें कर्तव्यकर्मा खेरीज आहे; परंतु असा वर्तनाचा तर्क जेव्हां अतिशय अविचारीपणा आणि त्यास अंगभूत असणाऱ्या दुसऱ्या कित्येक गोष्टी वरून करतां येतो तेव्हां असा अविचारीपणा दर्शित झाला आहे किंवा नाहीं ह्याचा निर्णय करण्याचे हेतूनें सदरील विचार करावा। विषयीं देशाचाल काय आहे व अशा प्रकारचे स्थितींत असणारे पक्षकारांची वहिवाट आणि उदमाचे त्या काळीं चालू असणार दर हीं लक्षांत आणावी अशी कीं, तेणेंकरून सव्द्याचा प्रकार ठीक ठरवतां येईल.

झालेले करारांबद्दल दस्तऐवज असो अथवा सावकाराचे वहींत सही किंवा निशाणी केलेली असो या दुसरे काहीं प्रकार असोत पण तो करार भितीमुळें किंवा अज्ञानामुळें झाला असें मानण्यास कारण असेल किंवा कराराअन्वयें व्याज देवविलें असतां सदरीं लिहिलेल्या नियमा विरुद्ध होईल असें दिसून तो व्याजाचे रकमेचा करार झाला आहे असेल तर व्याजाची पूर्ण रक्कम नगदी किंवा त्या मानें ऋणकोस देण्यात भाग पाडण्याचें कोर्टास नाहीं अशा स्थिती वरून जितकें व्याज वाजवी कोर्टास योग्य दिसेल तितकेंच देववावें.

८. अखेरीस कोर्टांस अशी सूचना करण्यांत कीं, हुकूमनामा न मिळविलेले सावकार दरानें व्याज घेतात त्या दरानें हुकूमनाम्याचे तारखे नंतर व्याज देववूं नये व आलेले हुकूमनाम्याची अमलबजावणी न करावी असा हुकूमनाम्यांचा वाढ उत्पन्न होऊं देऊं नये. आणखी कोर्टांस असें सुचविलें जातें कीं, हुकूमनाम्याचे रकमेंतील ठा भाग व्याज मिळून झाला आहे असें आढळेल तेव्हां त्या रकमेवर व्याज देवविणें कोर्टांस भाग नाहीं. सन १८६१ चे आक्ट २३ १० यांत दिलेले अख्त्यारीचा कोर्टानें योग्य करून ती अमलांत आणावी व असें व्याज न देवविण्याचा ठराव करण्यास कोर्टास अख्त्यार आहे.

हें पत्र अकोल्या एथें लंडेराव बाळाजी फडके चे वऱ्हाडसमाचार छा. छा प्र.